राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - १६७ ■ वर्ष - ४२

शनिवार,ता. १७ ऑक्टोबर २०२६ | अश्विन शु. ७ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००



# दिल्लीत सीजेपी आंदोलनाआधी राडा

## तिरंगा यात्रेपूर्वी दिपके, बोरा पोलिसांच्या ताब्यात

नवी दिल्ली,ता.१६(प्रतिनिधी)–

**कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या लहरा दो तिरंगा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत चांगलाच राडा झाल्याचे दिसून आले. कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्ककडे निघालेल्या अभिजीत दिपके यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याचबरोबर अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेच्या (एआयएसए) राष्ट्रीय अध्यक्ष नेहा बोरा यांना मंडी हाऊस येथून ताब्यात घेण्यात आले. सीजेपीच्या आंदोलनाला परवानगी नाही, असे कारण देत दिल्ली पोलिसांनी दिपके व बोरा यांना प्रस्तावित 'लहरा दो तिरंगा' यात्रेपूर्वीच ताब्यात घेतले आहे.**

ताब्यात घेण्यापूर्वी दिल्ली पोलीस दिपके ज्या ठिकाणी थांबले होते, तेथे पोहोचले आणि त्यांना मोर्चा न काढण्याबाबतची नोटीस बजावली. मात्र, त्यानंतरही दिपके दिल्लीतील तिरंगा रॅलीसाठी रवाना झाले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. नेहा बोरा यांना मंडी हाऊस येथून ताब्यात घेण्यात आले. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नवी दिल्ली परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३ लागू करण्यात आले होते. या कलमानुसार, परवानगीशिवाय आंदोलन करणे, मोर्चा काढणे आणि गर्दी जमवण्यास मनाई आहे.



व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये, पोलीस अधिकारी दिपके यांना अडवत 'तुम्हाला खबरदारीचा उपाय म्हणून ताब्यात घेतले जात आहे, कारण परिसरात बीएनएसएसची कलम १६३ लागू आहे आणि तुम्ही कनॉट प्लेसमध्ये जाऊ शकत नाही, असे सांगताना दिसत आहेत.

अभिजीत दिपके यांना पोलिसांनी रोखल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीने आपल्या अधिकृत एक्स खात्यावरून केंद्र सरकारवर टीका केली आहे. यापूर्वी आम आदमी पार्टीने (आप) दिल्ली प्रदेशाध्यक्ष सौरभ भारद्वाज यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या मुख्यालयातून तिरंगा यात्रा काढली. या यात्रेत पक्षाचे आमदार, नगरसेवक आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे.

उल्लेखनीय म्हणजे, कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी), डावे पक्ष, अन्य विरोधी पक्ष आणि विद्यार्थी संघटना या आंदोलनात प्रामुख्याने सक्रिय आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा आणि विशेष सखोल फेरतपासणीची (एसआयआर) प्रक्रिया तातडीने थांबवावी, अशी त्यांची मागणी आहे.

### राहुल गांधींचे 'मतचोरी'चे आरोप निराधार

# बांगलादेशच्या धर्तीवर सत्तांतराचे विरोधकांचे षडयंत्र–राजनाथ सिंह

■ लखनऊ,ता.१६–

**विरोधकांकडून होणार कथित मतचोरीचे आरोप निराधार आहेत. त्यांना देशात अराजकता निर्माण करून बांगलादेशच्या धर्तीवर सत्ता मिळवायची असल्याचा आरोप संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केला आहे. उत्तरप्रदेशच्या लखनऊ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

राजनाथ सिंह लखनऊ दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी त्यांच्या दौऱ्याचा दुसरा दिवस असून, यावेळी त्यांनी विविध राजकीय मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली. राहुल गांधी यांच्याकडे मतचोरीच्या आरोपांचे कोणतेही ठोस पुरावे नसल्याचा दावा करत त्यांनी काँग्रेसचे आरोप निराधार असल्याचे म्हटले. दिल्लीतील अलीकडील घटनाक्रमांवर भाष्य करताना राजनाथ सिंह म्हणाले की, या घटनांमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काँग्रेस आणि तिचे राजकीय सहकारी तसेच समर्थक संघटना युवकांच्या ऊर्जेला विधायक कार्य आणि राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने वळवण्याऐवजी राजकीय संघर्ष आणि अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील युवकांना अराजकतेच्या



राजकारणाचे प्यादे बनवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

बांगलादेशच्या धर्तीवर सत्तांतर घडवून आणण्याच्या कथित प्रयत्नांवर टीका करताना राजनाथ सिंह म्हणाले की, काही विरोधी नेते सत्तांतराबाबत उघडपणे वक्तव्ये करत आहेत. या वक्तव्यांवरून विरोधकांचा उद्देश लोकशाही संस्थांना कमकुवत करणे आणि देशात अस्थिरता निर्माण करणे हा असल्याचे दिसून येते, असा आरोप त्यांनी केला. मतदार यादीतील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयार), निवडणूक सुधारणा आणि मुख्य निवडणूक आयु ज्ञानेश कुमार यांच्याशी संबंधित मुद्द्यांवरून सुरू असलेला विरोध हा देशातील युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नसून, अराजकता निर्माण करून सत्ता मिळवण्याच्या प्रयत्नाचा भाग असल्याचा दावाही संरक्षणमंत्र्यांनी केला.

# एमपीएससी अध्यक्षपदाचा कार्यभार वाघोले यांच्याकडे

### – चौकशी आयोगाची अधिसूचनाही जारी

■ मुंबई,ता.१६–

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. त्यांच्या जागी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य सतीश वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यावतीने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे अन्न व औषध प्रशासनाची औषध निरीक्षक पदाची परीक्षा घेण्यात आली होती. त्या परीक्षेचा पेपर फुटल्याचे समोर आल्यानंतर आयोगातील काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. यावेळी पेपरफुटीसाठी जबाबदार असल्याच्या आरोपानंतर माजी सचिव महेंद्र हरपाळकर यांना त्यांच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यांच्या जागी सरकारने मुंबई उपनगरीय जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना एमपीएससी सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभारही दिला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याचे स्पष्ट होताच विद्यार्थ्यांनी आयुक्त विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती.

एमपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी दहा दिवस पुण्यात आंदोलन केले होते. तेव्हा सरकारने आयोगातील गैरप्रकार आणि पेपरफुटी संदर्भात चौकशी समिती स्थापन केली जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार चौकशी आयोगाची अधिसूचना काढण्यात आली आहे. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यत भिमनावर यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले होते. यासाठी राज्य सरकारकडून मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रयत्न केले. दरम्यान, भीमनवार हे रजेवर गेल्याने त्यांच्या जागी अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतीश वाघोले यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# मालेगाव : डोंगराळे प्रकरणात नराधम दोषीला फाशी

### पीडित कुटुंबाला १० लाखांची भरपाई

■ मालेगाव,ता.१६–

**तीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार आणि निर्घृण हत्येने हादरलेल्या डोंगराळे प्रकरणात न्यायालयाने दोषी विजय खैरनार याला फाशीची शिक्षा सुनावली. दोन स्वतंत्र गुन्ह्यांत प्रत्येकी सात वर्षांचा कारावास आणि पीडित कुटुंबाला १० लाखांची भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. राज्यभर संतापाची लाट निर्माण करणाऱ्या या प्रकरणात न्यायालयाच्या निकालाने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.**



नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करून हत्या केल्याची घटना दहा महिन्यांपूर्वी घडली होती. दरम्यान आता या अत्याचार–हत्या प्रकरणाचा आज शुक्रवारी फैसला झाला. चार वर्षीय चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा ऐतिहासिक निकाल जाहीर करण्यात आला.

मालेगाव अपर जिल्हा व सत्र न्यायालयात आज शुक्रवारी निकाल जाहीर करत आरोपी विजय खैरनार याला फाशीची शिक्षा सुनावली. या प्रकरणात कोर्टाने दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरण म्हणत नराधमाला फाशीची दिली. या प्रकरणाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

मालेगावच्या डोंगराळे भागात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी ही घटना घडली होती. आरोपी विजय खैरनार यावर दोषी असल्याचे आरोपी निश्चिती झाली होती. या प्रकरणात शासन नियुक्त विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी बाजू मांडली. शुक्रवारी कोर्टाने न्याय दिल्याने मालेगावकरांनी समाधान व्यक्त केले.

# आंदोलनाच्या आडून अराजकता पसरवण्याचा उद्देश–फडणवीस

■ मुंबई,ता.१६–

**'इट्स डन ब्रो, सर्वकाही जाहीर झालंय. अखेर हे सर्वकाही सत्ता बदलासाठी आहे. शेवटी मनात होतं ते ओठांवर आलंच, अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट केली आहे. सर्व खेळ सत्तेची खुर्ची मिळवण्याचा आहे. मग, त्यासाठी विद्यार्थी, शेतकऱ्यांना चिथावणी द्यावी लागली तरी चालेल, जाती, भाषेच्या नावावर द्वेष पसरवावा लागला तरी चालेल. देशाच्या प्रतिष्ठीत संस्थांची प्रतिमा मलीन केली जात आहे. आंदोलनाच्या आडून अराजकता पसरवण्याचा यांचा उद्देश आहे, असेही फडणवीस यांनी म्हटले आहे.**



नवी दिल्ली प्रेस क्लबमध्ये एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भूषण यांनी देशात रिजीम चेंज हवा असे म्हटले आहे. त्यात काही चुकीचे नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. मोदी सरकार देशात निवडणूक लोकशाही चिरडून टाकण्यावर ठाम आहे, असे प्रशांत भूषण म्हणाले. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

भूषण पुढे म्हणाले की, हे सरकार वारंवार बोलते की, विरोधी पक्षाकडून हा सत्ता परिवर्तनाचा प्रयत्न आहे. आम्ही फक्त देशात निवडणूक लोकशाही वाचवण्याचा प्रयत्न करतोय. ही अशीच क्रूरता सुरु राहिली तर सत्ता परिवर्तन जरुर होईल. आम्हासर्वांना सत्ता परिवर्तन हवे आहे. यात काही चुकीचे आहे का? सत्ता परिवर्तन नागरिकाचा अधिकार आहे.

# सरन्यायमूर्तींवरील वक्तव्यांप्रकरणी राऊत, वागळेंना सुप्रीमची नोटीस

नवी दिल्ली,ता.१६–

**भारताचे सरन्यायाधीश (सीजेआय) यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राज्यसभा खासदार संजय राऊत आणि पत्रकार निखिल वागळे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या न्यायालयाचा अवमान याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे.**

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने दोघांनाही पुढील सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष उपस्थित राहण्यापासून सूट दिली. तसेच, न्यायव्यवस्थेबाबत करण्यात आलेल्या वक्तव्यांची गंभीर दखल घेत, एखाद्या संस्थेवर अशा प्रकारे टीका होणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे न्यायालयाने म्हटले.

संजय राऊत आणि निखिल वागळे यांनी सरन्यायाधीशांबाबत केलेल्या वक्तव्यांवरून सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने दोघांनाही नोटीस बजावली.

# महायुती ठरावधारकांच्या निष्ठेच्या आणाभाका

■ कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी) –

**कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची निवडणूक अंतिम टप्प्यात आली असताना ठराव धारक विविध देवस्थानाच्या ठिकाणी जाऊन निष्ठेच्या आणाभाका घेताना दिसत आहेत. राधानगरी आणि भुदरगड तालुक्यात माजी आमदार के. पी. पाटील आणि पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यातील समझोता एक्सप्रेस सुसाट निघाल्याचे दिसत आहे. त्यांच्या जोडीला ए. वाय. पाटील यांचे इंजिन लागल्यामुळे महायुतीच्या ठराव धारकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. या दोन्ही तालुक्यातील ठरावधारक आदमापुर इथल्या संत बाळूमामा यांचे दर्शन घेऊन मतदानासाठी एकत्रितपणे येणार आहेत.**

शाहूवाडी, पन्हाळा आणि गगनबावडा तालुक्यातील ठरावधारक उदगीर इथल्या श्री. काळम्मा विठ्ठलाई देवीच्या दर्शनासाठी रवाना झाले आहेत. हे देवस्थान अत्यंत जागृत म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला पॅनल टू पॅनल मतदान करण्याच्या आणाभाका घेत ठरावधारक आपापल्या नेत्यांना आश्वस्त करत आहेत. एकंदरीतच विरोधकांनी केलेल्या सिंगल व्होटींगच्या आवाहनाला अत्यल्प प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

महायुतीतील अंतर्गत संघर्ष पूर्णपणे संपला असून सर्वजण एकदिलाने विजयासाठी कार्यरत राहतील हे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे भाकीत खरे होताना दिसत आहे.

करवीर तालुक्यातील बहुतांशी ठरावधारक सौंदत्ती येथे श्री. यल्लमा देवीचे दर्शन घेऊन थेट मतदानाला येणार आहेत. देवस्थानाला भेट देऊन एक प्रकारे आपल्या निष्ठेची खात्री ठरावधारकांकडून नेत्यांना दिली जात आहे. या निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व नेत्यांमध्ये झालेली दिलजमाई नव्या राजकीय समीकरणांना आकार देईल, अशी चर्चा आहे.

# राम मंदिर परिसरातील कामे १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होणार

### अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा

■ अयोध्या,ता.१६–

**अयोध्येतील श्रीराम मंदिर परिसरातील बहुतांश बांधकामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी शुक्रवारी दिली.**

मंदिर परिसरातील एकूण सुमारे १५० बांधकाम प्रकल्पांपैकी १४८ कामे पूर्ण झाली असून, ती श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. आता प्रामुख्याने परकोट्याच्या मुख्य बांधकामासह काही अंतिम कामे पूर्ण होणे बाकी आहे. बांधकामाची जबाबदारी सांभाळणाऱ्या एल अँड टी कंपनीने पूर्ण झालेली कामे ट्रस्टकडे हस्तांतरित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रक्रियेत संबंधित नोंदी, आराखडे, डिझाइन आणि आर्थिक कागदपत्रेही सुपूर्द करावी लागतात. ट्रस्टचे प्रकल्प अभियंते या कामांची तपासणी करतात. तपासणीनंतरच कामे अधिकृतपणे स्वीकारली जातात. मंदिर परिसरातील १५० कामांपैकी १४८ कामे पूर्ण होऊन ट्रस्टकडे हस्तांतरित झाली आहेत. आता परकोट्याचे मुख्य बांधकाम अधिकृतपणे सुपूर्द करणे बाकी आहे. श्रीराम मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा, अंतिम सजावट आणि विद्युत रोषणाईची कामे सध्या अंतिम टप्प्यात आहेत. ही सर्व प्रलंबित कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे १५ नोव्हेंबरपर्यंत मंदिर परिसरातील उर्वरित कामे पूर्ण होतील.

# अंबाबाई मंदिरात महिला भाविकांना मारहाण

### अदखलपात्र गुन्हा दाखल

■ कोल्हापूर, ता. १६ (प्रतिनिधी) –

**करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिराच्या पितळी उंबरा या ठिकाणी महिला भाविकांना एका महिलेने मारहाण केल्याची घटना शुक्रवारी पहाटे घडली. सदर महिलाही श्री पूजकाची पत्नी असल्याच्या आरोप सायली भोसले यांनी केला आहे . त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रिया योगेश जोशी यांच्याविरोधात जुना राजवाडा पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे.**

पापाची तिकटी परिसरात राहणाऱ्या सायली भोसले या शुक्रवारी पहाटे त्यांची सासू सुवर्ण भोसले, मुलगा श्लोक आणि अन्य दोन मैत्रिणींसह अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. मंदिराच्या आवारातील मुखदर्शन चौकात त्या बसल्या असताना प्रिया जोशी यांनी त्यांना दहा मिनिटांत जागा रिकामी करण्यास सांगितले. त्यानंतर सायली भोसले आणि त्यांच्या सासू सुवर्ण भोसले यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेचे चित्रीकरण मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाले आहे. भोसले यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रिया जोशी यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# संबंधित महिलेचा श्रीपूजकांशी संबंध नाही

### श्रीपूजक अजित ठाणेकर यांचा खुलासा

■ कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)–

**करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात महिला भाविकांना धक्काबुक्की झाल्याच्या प्रकरणातील संबंधित महिलेचा श्रीपूजक कुटुंबाशी संबंध नसल्याचा खुलासा श्रीपूजक अजित ठाणेकर यांनी केला आहे. 'पुजाऱ्याच्या पत्नीकडून भाविकांना मारहाण' असा उल्लेख करून श्रीपूजकांची बदनामी केली जात असल्याचा दावाही त्यांनी केला.**

मंदिरातील धक्काबुक्कीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाला आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरातील संवेदनशील सीसीटीव्ही फुटेज बाहेर जाणे गंभीर असल्याचे ठाणेकर यांनी म्हटले आहे. फुटेज कोणी प्रसारित केले, याची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत. तसेच कर्मचाऱ्यांकडून फुटेज बाहेर गेले असल्यास संबंधितांना बडतर्फ करावे, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. मंदिरातील धक्काबुक्कीचा प्रकार अयोग्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# सांगली बाजार समितीत हळदीस ३१,१०० रुपये उच्चांकी भाव!



सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीचा लिलाव झाला त्याप्रसंगीचे छायाचित्र.

■ सांगली,ता.१६(प्रतिनिधी)–

**सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली येथे शुक्रवारी झालेल्या हळदीच्या सौद्यामध्ये हळदीस प्रति क्विंटल ३१ हजार १०० रुपये असा उच्चांकी भाव मिळाला.**

मे. यशवंत ट्रेडर्स या दुकानातील सौद्यामध्ये बावची, ता.वाळवा येथील शेतकरी रवींद्र गोविंद पाटील यांच्या २० पोती हळदीला हा उच्चांकी दर मिळाला.

वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली येथील मे. सूरज कॉर्पोरेशनचे मालक सूरज खोत यांनी या हळदीची खरेदी केली.

सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती ही हळद या शेतीमालाच्या विक्रीसाठी देशभरात प्रसिद्ध आहे. शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल खुल्या सौद्यामध्ये विक्रीसाठी वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली येथे जास्तीत जास्त आणावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती आनंदराव नलवडे यांनी केले.

याप्रसंगी बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने खरेदीदार, व्यापारी, शेतकरी, हमाल व इतर उपस्थित होते.

**भावपूर्ण श्रध्दांजली**



कै. श्रीमती यशोदा बाबुराव इंगवले

आठवणीत सतत आहात,
मनात आमच्या नेहमी राहाल
कधी न विझणारी तुमची माया
आमच्या आयुष्यभर सोबत राहिल.

अशोक बाबुराव इंगवले
इंगवले परिवार, इचलकरंजी

उत्तरकार्य :- आज शनिवार दि. १७/१०/२०२६ रोजीसकाळी ११ वाजता कामधेनू हॉल, फॅक्टरी रोड, डीके पेट्रोल पंपाजवळ, इचलकरंजी येथे आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजलि ।**



श्रीमती बसंतीदेवी रामस्वरुपजी सोमाणी

हमारे आदरणीय ब्याणजी श्रीमती बसंतीदेवी रामस्वरुपजी सोमाणी का वैकुण्ठवास दिनांक १५/१०/२०२६ को हो गया है । ईश्वर से प्रार्थना करते है कि पुण्य आत्मा को श्री चरणों में स्थान प्रदान करे ।

मदनलाल,नेमीचंद,रामनिवास,कृष्णमुरारी एवम् भराडीया परिवार-इचलकरंजी,हैदराबाद,बाजवास
ओमप्रकाश,महेश,गोविंद,गोपाल,गिरधर एवम् जाखोटिया परिवार-वरोरा,चिमूर
अशोक,गोविन्द,धीरज,शुभम एवम् मालू परिवार, निजामाबाद
राजगोपाल,बंकटलाल,श्रीनिवास,लक्ष्मीनिवास,रामनिवास,गोविंद एवम् काबरा परिवार,गुलेदगुड
ओमप्रकाश,महेश,अंकित एवं गट्टाणी परिवार,इचलकरंजी.
गोविंद,शुभम,शिवम एवम् लटूरिया परिवार, इचलकरंजी.

उठावना : शनिवार, दि. १७/१०/२०२६,
तांबे माल, बसंत कॉलोनी, इचलकरंजी यहाँ पे होगा ।

ॐ शांति

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

नवरात्र उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्री मात्रे नमः।।



श्रीमाता कालरात्री

ॐ एकवेणी जपाकर्ण
पूरा नग्न खरास्थिता ।
लम्बोष्ठी कर्णिका कर्णी
तैलाभ्याक्तशरीरिणी ।।
वाम पादोल्लसल्लोहलता
कण्टकभूषणा ।
बर्धन् मूर्धम् ध्वजा
कृष्णा कालरात्रिर्भयंकरी ।।



नवदुर्गामधील सप्तम दुर्गा कालरात्री माता आहेत. कालरात्री माता कृष्णवर्णीय असून गर्दभ अर्थात गाढव हे त्यांचे वाहन आहे. त्या चतुर्भज असून खड्ग, लोहकष्टक हातामध्ये धारण केले असून वर आणि अभय प्रदान करतात. स्त्री जीवनातील कुटुंब व्यवस्थापन करणारी स्त्री भावनाप्रधान व सौम्य चित्त असली तरी प्रसंगी कुटुंब रक्षणासाठी संकटावर काली प्रमाणे तुटून पडू शकते. याच शौर्य शक्तीचे प्रतिक म्हणजेच कालरात्री दुर्गा होय.



नवरात्रौत्सवाच्या सहाव्या माळेला श्री चौंडेश्वरी देवीची आरती करताना मानकरी.

## श्री चौंडेश्वरीची बनशंकरी देवी रूपात पूजा

इचलकरंजी,ता.१६-

**नवरात्रौत्सवाच्या सहाव्या माळेला शुक्रवारी श्री चौंडेश्वरी मातेची बनशंकरी देवीच्या भव्य आणि दिव्य स्वरूपात पूजा बांधण्यात आली. देवीच्या या तेजस्वी रूपाचे दर्शन घेताना मन भक्तिभावाने भरून येत होते. शक्ती, श्रद्धा व सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.**

आजच्या आरतीचा मान देवांग समाजातील नर्सेस भगिनी आणि त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आला.हा केवळ आरतीचा मान नसून, त्यांच्या सेवाकार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा सुंदर क्षण आहे.श्री. व सौ.मोनिका राजू गायकवाड (बारवाडे), श्री. व सौ.करुणा दिपक तावरे, श्री. व सौ. माया सचिन बुचडे, श्री.व सौ.मोनिका अनिकेत फासे, श्री.व सौ. प्रतिक्षा ज्ञानेश्वर पाकले, श्रीमती संजीवनी बाबर, श्री.व सौ.पूनम अमोल बुगड, श्री.व सौ.सरस्वती नरेंद्र म्हेतर, जान्हवी प्रसन्न होगाडे, सौ. केतकी प्रसन्न होगाडे, प्रसन्न बाळासाहेब होगाडे,आर्यन प्रसन्न होगाडे यांच्या हस्ते आरती झाली.

आम्ही नवदुर्गा या उपक्रमांतर्गत जान्हवी प्रसन्न होगाडे यांना दुर्गा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आरतीच्या वेळी समाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार, विश्वस्त मंडळ आणि समाजाच्या विविध संस्थांचे पदाधिकारी व परिसरातील भाविक उपस्थित होते.

# न्यायालयाच्या आदेशावर प्रशासन ठाम

## मुख्य रस्त्यावरील दिवाळी बाजाराबाबत सोमवारी बैठक

इचलकरंजी, ता.१६-

**शहरातील मुख्य मार्गावर दिवाळी बाजार भरवण्याच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी शुक्रवारी महानगरपालिकेत पोलीस प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांची बैठक झाली. या बैठकीत न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यावर प्रशासन ठाम राहिले. त्यामुळे व्यापाऱ्यांची बैठक घेऊन मुख्य मार्गावर बाजार भरवण्याबाबत सोमवारी निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे बैठकीत कोणता निर्णय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

शहरात अतिक्रमणा विरोधात मोहिम राबवुन रस्ते अतिक्रमण मुक्त केल्यापासून मुख्य मार्गावर फेरीवाले, छोटे व्यापारी, विक्रेत्यांना व्यवसाय करण्यास मज्जाव करण्यात आला आहे. तरीही नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवात मुख्य मार्गावर मंडळांच्या स्वागतासाठी राजकीय पक्ष, संघटनांनी स्वागत कक्ष उभारले होते. त्यामुळे महापालिका प्रशासन दुजाभाव करत असल्याचा आरोप करत छोटे विक्रेते, फेरीवाल्यांनी मुख्य मार्गावर दिवाळी बाजार भरवण्यास परंपरेप्रमाणे परवानगी देण्याची मागणी लावून धरली आहे. या मागणीसाठी महापालिकेवर मोर्चा काढुन ठिय्या आंदोलनही केले.



महापौर उदय धातुंडे यांच्या उपस्थितीत महानगरपालिका प्रशासन व पोलिस प्रशासन यांची बैठक झाली. (छाया : मयूर चिंदे)

दरम्यान, महापौर उदय धातुंडे यांच्यासह महापालिकेचे सर्व सभापती, नगरसेवकांच्या बैठकीत पुढील वर्षापासून गणेशोत्सवात मुख्य मार्गावर स्वागत कक्ष उभारण्यास परवानगी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरीही छोटे विक्रेते दिवाळी बाजार मुख्य मार्गावर भरण्याची मागणी करत आहेत. त्यामुळे तोडगा काढण्यासाठी शुक्रवारी महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या, आयुक्त पल्लवी पाटील यांच्यासह सर्व सभापती आणि शिवाजीनगर, गावभागचे पोलीस निरीक्षक, वाहतुक निरीक्षक यांच्या उपस्थितीत महापालिकेत बैठक झाली. यावेळी पोलीस प्रशासनाने मुख्य मार्गावर बाजार न भरवण्याच्या न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली. तसेच सोमवारी व्यापाऱ्यांची बैठक घेऊन मुख्य मार्गावर बाजार भरवण्याबाबतचा निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे सोमवारच्या बैठकीत काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

Shri Shamrao Patil (Yadravkar) Educational & Charitable Trust's

**Sharad School & Jr. College**

A/P.: Ghosarwad/Dattawad, Dist: Kolhapur State : Maharashtra. Contact No : 9590334033

**Wanted**

| Sr. | Post | Qualification |
|---|---|---|
| 1 | Teacher | M.Sc./B.Sc./B.Ed<br>M.A./B.Ed. (English) |
| 2 | Sports Teacher | B.P. Ed. (Female Only) |

**Excellent comnunication skill in English is Must**

Qualified & Interested Candidate can send their updated Resume to career@sitcoe.org.in.patilpriya5252@gmail.com within 10 days.
Date : 16/10/2026

**Shri Anil Bagane** Executive Director | **Hon. Rajendra Patil (Yadravkar)** Chairman

## रेल्वेच्या धडकेत युवक ठार

सांगली, ता.१६(प्रतिनिधी)-

**सांगली ते मिरज रेल्वे मार्गावर विश्रामबाग रेल्वे स्थानकाजवळ रेल्वेच्या धडकेत रोहन रामचंद्र माने (वय ३५, रा. चांदणी चौक) हा युवक ठार झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. याबाबत विश्रामबाग पोलिसात नोंद झाली आहे.**

रोहन माने याचे सलून दुकान आहे. शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास तो विश्रामबाग रेल्वे स्थानकाकडे गेला होता. अजमेर एक्स्प्रेसच्या धडकेत तो ठार झाल्याची घटना काही वेळाने उघडकीस आली. अपघाताची माहिती मिळताच विश्रामबाग व रेल्वे पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे.

दै. महासत्ता कोल्हापूर विभागीय कार्यालयाच्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**ग्रामपंचायत बसरेवाडी**

ता. भुदरगड जि. कोल्हापुर.

*** झाडे लावा झाडे जगवा पर्यावरण वाचवा ***

**माझे गाव आरोग्य संपन्न गाव गावासाठी सर्वांनी सहकार्य करा.**

* गावात शंभर टक्के कुटूंबाने प्लॅस्टिकचा वापर बंद करावा.
* प्लॅस्टिक पिशवी ऐवजी कापडी पिशवीचा वापर करा.
* घरगुती कचऱ्याचे योग्य प्रकारे नियोजन करावे.
* घरगुती सांडपाणी व्यवस्थापन वैयक्तिक स्तरावर करावे.

ग्रामपंचायत अधिकारी श्री. विजय दाभोळे | प्रशासक श्री. प्रभाकर जाधव

कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ बसरेवाडी






महासत्ता

सुविचार :- "स्वतःवर विश्वास ठेवा, कारण तोच तुमचा खरा साथीदार आहे."



▪ संपादकीय ▪

# मदतीचा दिलासा; पण...

महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता वाढत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची आगाऊ मदत देण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. सुमारे एक ते सव्वा कोटी शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ होणार असून, त्यासाठी जवळपास ६ हजार कोटी रुपयांची तरतूद अपेक्षित आहे. आणखी ४० तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश, कर्जवसुलीला स्थगिती, पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था अशा उपाययोजनांमुळे संकटग्रस्त ग्रामीण भागाला आधार मिळणार आहे. दुष्काळी मदतीच्या वितरणाची संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होण्याची प्रतीक्षा न करता सरकारने घेतलेला हा पुढाकार संवेदनशील आणि समयोचित म्हणावा लागेल. मात्र, या निर्णयाचे स्वागत करताना महाराष्ट्रातील दुष्काळ व्यवस्थापनातील जुन्या त्रुटींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. दर काही वर्षांनी उद्‌भवणाऱ्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यात राज्यकर्त्यांना अपेक्षित यश का मिळाले नाही, या प्रश्नाचे उत्तरही सरकारला द्यावे लागेल. अपुरा पाऊस, करपलेली पिके, आटलेल्या विहिरी आणि वाढता कर्जबोजा यामुळे राज्यातील शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. शेतीत केलेली गुंतवणूक वाया गेल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. दिवाळीसारखा महत्त्वाचा सण तोंडावर असताना दैनंदिन गरजा भागविण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. अशा परिस्थितीत थेट बँक खात्यात जमा होणारे ५ हजार रुपये काही प्रमाणात दिलासा देतील. विशेषतः अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी ही रक्कम उपयोगी ठरू शकते. तथापि, बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर हजारो रुपये खर्च केलेल्या शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत ही मदत अत्यल्प आहे. त्यामुळे आगाऊ मदतीनंतर अंतिम नुकसानभरपाई किती आणि कधी मिळणार, याचे स्पष्ट वेळापत्रक सरकारने जाहीर करायला हवे. राज्य सरकारने ऑक्टोबरमध्येच दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घेतला, ही प्रशासकीय तत्परता निश्चितच कौतुकास्पद आहे. आणखी ४० तालुक्यांचा समावेश झाल्याने दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ झाली आहे. या भागांत जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, कृषिपंपांच्या वीजबिलात सवलत आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा उपाययोजना लागू होणार आहेत. या सवलतींचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणे महत्त्वाचे आहे. यापूर्वी अनेकदा सरकारी घोषणांचा गाजावाजा झाला; मात्र लाभार्थ्यांची पडताळणी, कागदपत्रांची पूर्तता आणि निधी वितरणातील विलंबामुळे शेतकऱ्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागले. यंदा त्या अनुभवाची पुनरावृत्ती होणार नाही, याची जबाबदारी प्रशासनाने स्वीकारली पाहिजे. दुष्काळी उपाययोजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडणार आहे. आगाऊ मदतीसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद,महसुली सवलती, पाणीपुरवठा, चारा व्यवस्थापन आणि कर्जपुनर्गठनासाठी लागणारा निधी यांचा एकत्रित विचार करावा लागेल. आधीच विविध योजनांच्या आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या राज्य सरकारपुढे हा मोठा पेच आहे. तथापि, शेतकऱ्यांना दिलेल्या मदतीचा आर्थिक भार सांगताना सरकारने आपल्या इतर खर्चाच्या प्राधान्यक्रमांचेही परीक्षण करायला हवे. जाहिरातबाजी, अनावश्यक प्रशासकीय खर्च आणि राजकीय सोयीच्या योजनांवरील खर्चाला आवर घातल्याशिवाय आर्थिक शिस्तीची अपेक्षा पूर्ण होणार नाही. संकटग्रस्त शेतकऱ्याला मदत देणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे. दुष्काळाच्या निमित्ताने राज्याच्या जलव्यवस्थापनातील गंभीर उणिवाही पुन्हा समोर आल्या आहेत. मराठवाड्यात भूजलपातळी सुमारे ३ मीटरने खालावल्याची माहिती सरकारने दिली आहे. पाणीपुरवठ्यासाठी टँकर उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या वाहतुकीवर जीपीएसद्वारे लक्ष ठेवणे आवश्यकच आहे; परंतु वर्षानुवर्षे टँकरवर अवलंबून राहणाऱ्या गावांची संख्या कमी का होत नाही, याचा विचार झाला पाहिजे. जलसंधारणाच्या विविध योजनांवर मोठा खर्च होऊनही अनेक गावांना उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. जलसंधारणाच्या कामांचे स्वतंत्र मूल्यमापन, भूजल पुनर्भरण आणि पिकांच्या पाणीवापराचे नियोजन यांना प्राधान्य देण्याची गरज आहे.उत्पन्नाचे साधनच नष्ट झालेल्या शेतकऱ्याला पुढील हंगामात थकीत कर्जासह नव्या लागवडीचा खर्च उभा करावा लागणार आहे.सहकारी बँका,राष्ट्रीयीकृत बँका आणि खासगी वित्तीय संस्थांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांबाबत एकसमान संवेदनशील धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता, रोजगार हमीची कामे आणि ग्रामीण मजुरांच्या उपजीविकेचे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत.सरकारसाठी दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला पुढील हंगामासाठी पुन्हा उभे करणे ही खरी कसोटी असणार आहे.

# अमेरिकेचा दुटप्पीपणा

**अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांपूर्वी इंधनाचे भडकलेले दर नियंत्रित करण्याच्या उद्देशाने, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी एक करार केला आहे. याद्वारे रशियन इंधनाला अमेरिकी बाजारपेठेत प्रवेश करण्यास परवानगी दिली जाईल. अमेरिकेला आता स्वतःला झळ बसू लागल्याने ट्रम्प यांना हे शहाणपण सूचले आहे.**

युक्रेनने रशियन रिफायनरीजवर केलेल्या हल्ल्यांमुळे डिझेलचे भाव भडकले आहेत. याशिवाय, इराण आणि त्यांच्या हुथी मित्रपक्षांनीही मध्यपूर्वेतील रिफायनरीजवर हल्ले केले असून, होर्मुझमधून होणारी निर्यात विस्कळीत केल्यामुळे इंधनाचा पुरवठा अधिकच कोलमडला आहे. ट्रम्प यांच्या करारातील रशियन डीझेल नेमके कुठून येणार, हे अद्याप अस्पष्ट आहे. रशियन वृत्तसंस्था तास नुसार, रशियाने शनिवारी जाहीर केले की, अमेरिकेसोबत झालेल्या करारानुसार इंधन पुरवठा करण्यासाठी ते त्यांची निर्यात बंदी अंशतः शिथिल करत आहेत. गेल्या दोन-अडीच वर्षांपासून अमेरिका जगाला नैतिकतेचे धडे देत होती. डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध जागतिक मंचावरून उगारलेली बोटे आणि उपदेशांचे डोस भारताला रोज ऐकावे लागत होते. चीनविषयीही ट्रम्प यांना बोलायचे होते, तथापि, त्यांचे ते धाडस झाले नाही. त्यामुळे भारत त्यांना बळीचा बकरा वाटला. तुम्ही रशियाकडून कच्च्या तेलाचा एक थेंब जरी विकत घेतला, तरी तुम्ही थेट पुतिन यांच्या युद्धयंत्रणेला खतपाणी घालत आहात असा कांगावा ट्रम्प आणि त्यांच्या टीमकडून सातत्याने सुरू होता. भारताने आपली गरज आणि तिची आवश्यकता यासंदर्भात वेळोवेळी आपली भूमिका मांडली असूनही भारताला धमक्या दिल्या गेल्या. निर्बंधांचे इशारे दिले गेले आणि २०२५ मध्ये ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादला. रशियाचे तेल म्हणजे पाप आणि अमेरिकन नैतिकता म्हणजे अंतिम सत्य असे बिंबवण्याचा कुठेतरी त्यांचा प्रयत्न होता.



सप्टेंबर २०२६ मध्ये या नैतिकतेचा उमाळा इतका तीव्र झाला की, अमेरिकन काँग्रेसने लिंडसे ग्रॅहम रशिया इराण निर्बंध कायदा संमत केला. डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत अभिमानाने त्यावर सही केली. रशियाकडून ऊर्जा खरेदी करणाऱ्या भारत किंवा चीनसारख्या देशांवर तब्बल १०० टक्के दंडात्मक टॅरिफ लादण्याची दिव्य शक्ती ट्रम्प प्रशासनाला मिळाली. भारताने आपली वर्तणूक सुधारावी, रशियन युद्धाला पैसा पुरवू नये असे बजावले गेले. मात्र, आता अमेरिकेत मध्यावधी निवडणुका तोंडावर आल्या आणि देशात डीझेलचे दर प्रति गॅलन ६.५२ डॉलरवर जाऊन भडकले. ट्रॅक्टर आणि ट्रक जागच्या जागी ठप्प होण्याची वेळ आली. अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरू लागताच, अमेरिकेची तथाकथित जागतिक नीतिमत्ता मावळली. ज्या ट्रम्प यांनी तीन आठवड्यांपूर्वी स्वतःच्या हाताने कायद्यावर सही केली होती, त्यांनीच तो कायदा कचऱ्याच्या डब्यात फेकला. पुतीन यांच्याशी सौदा केला आणि रशियन डीझेल थेट अमेरिकेत आयात करण्याचा मार्ग मोकळा केला.

ट्रम्प यांच्या प्रशासनाने अत्यंत वेगाने आदेश काढून एप्रिल २०२७ पर्यंत रशियन डीझेलची जहाजे अमेरिकन बंदरांवर येण्यासाठी परवाने जारी केले. याला अध्यक्षांची मुत्सद्देगिरी आणि व्यावहारिक शहाणपण म्हटले जाते आहे. ट्रम्प यांच्या या डबल ढोलकीपणामुळे 'अमेरिका फर्स्ट'चा खरा अर्थ आता जगासमोर उघडा झाला आहे. 'अमेरिका फर्स्ट' म्हणजे 'जगा सांगे ब्रह्मज्ञान' असा ढोंगीपणा असल्याचे स्पष्ट दिसते आहे. आपल्या या पापावर पांघरूण घालण्यासाठी रशिया - युक्रेनमध्ये ऊर्जा युद्धबंदी झाल्याची भाकड कथा याच ट्रम्प यांनी रचली. पण पुढच्याच दिवशी रशियन बॉम्ब युक्रेनवर पडले आणि युक्रेनच्या अध्यक्षांनी ट्रम्प यांचा युद्धबंदीचा दावा फेटाळला. त्यावर माघार न घेता आणि याची किंचितही चाड न बाळगता उलट 'आता युक्रेनला नवीन अध्यक्ष शोधायची वेळ आली आहे, म्हणजे विषयच संपला' अशी फालतू

**दैनंदिनी**

टिप्पणी ट्रम्प यांनी केली. त्यांच्या निलाजऱ्या दुटप्पीपणाला आता अमेरिकन काँग्रेसमधील १२ बड्या सीनेटर्सनीही, ज्यात ६ रिपब्लिकन आणि ६ डेमोक्रॅट्स आहेत विरोध केला असून ट्रम्प यांच्या या निर्णयाविरुद्ध बंड पुकारले आहे. हा करार म्हणजे युक्रेनच्या जनतेचा विश्वासघात आणि शत्रूला दिलेली भेट आहे, असे उघड पत्र त्यांनी ट्रम्प यांना लिहिले आहे. जर ट्रम्प असेच रशियाशी बेकायदेशीर तेलाचे सौदे करत राहिले, तर उद्या अमेरिकेला स्वतःवरच निर्बंध लादावे लागतील असा इशारा त्यांनी दिला आहे. या घटनाक्रमाच्या निमित्ताने भारताची आपल्या करारांमुळे आणि एककल्लीपणामुळे नेमकी काय अडचण होते आहे हे अमेरिकेच्या नेत्यांना समजले असावे. त्यांना अजूनही ते समजणार नसेल तर त्यांचे देवच रक्षण करो. या सगळ्यातून भारताने अथवा अन्य देशांनीही एक धडा मात्र निश्चित घेतला पाहिजे. तो म्हणजे पाश्चिमात्य निर्बंध हे काय जागतिक न्यायाचे मापदंड नाहीत; किंवा ती कधीही मिटणार नाही अशी कोणती रेषही नाही. तर ती केवळ एक लवचिक, त्यांच्या सोयीनुसार आखली जाणारी आणि मिटवली जाणारी रेषा आहे. जेव्हा या देशांना हुडहुडी भरते, तेव्हा यांचे निकष वेगळे असतात. ऊब मिळवण्यासाठी मग यांना रशियन डीझेल चालते. पण तेच अन्य कोणत्या देशाने आपले दळणवळण आणि अगदी चूल पेटावी यासाठी केले तर यांना दादागिरी करायची असते. जगाने आणि खुद्द अमेरिकेनेही या सगळ्यातून बोध घ्यावा आणि वेळीच दुरूस्ती करावी. अन्यथा नवी समीकरणे तयार व्हायला वेळ नक्कीच जाईल.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पाच हजाराचे गाजर

## सरकारच्या निर्णयावर संमीश्र प्रतिक्रिया; मदत तुटपुंजी असल्याची टिका

**...अख्खा खरीप हंगाम वाया गेला आहे. अल निनोमुळे संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने तातडीने मदत देण्याची अपेक्षा आहे. बुधवारी १४ ऑक्टोबरला सरकारने राज्यातील आणखी ४० तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. म्हणजेच याआधी २६ सप्टेंबरला २६५ आणि आता ४० असे मिळून सरकारने एकूण ३०५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत.**



याचाच अर्थ ८५ टक्के राज्य आजमितीला दुष्काळग्रस्त आहे. दुष्काळाच्या निकषाप्रमाणे सरकार शेतकऱ्यांना मदतही करेल. पण आताची स्थिती अशी आहे की, खरीप हंगामावर खर्च करूनही शेतकऱ्यांच्या हाती काही लागलेले नाही,कारण पावसाअभावी पिके करपली आहेत. शिवाय रब्बी हंगामदेखील वाया गेल्यात जमा आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती खूप अवघड झाली आहे. डोक्यावर कर्ज, घरातील धान्य संपलेले असल्यामुळे शेतकऱ्याचा खिसा रिकामाच राहणार आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सावरण्याची आणि त्यांना भक्कम आधार देण्याची जबाबदारी सरकारची आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, हे वाक्य मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री वारंवार बोलत असतात. पण, त्याची प्रचिती प्रत्यक्ष मदतीतून दिसून येत नाही, हे सरकारने लक्षात घ्यावे.

आता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा सरकारने केली आहे. ही अग्रीम मदत असून दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे सांगण्यात आले. आजपासून २० दिवसांनी दिवाळी आहे. एवढ्या कमी वेळात सरकार खरोखर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे कसे जमा करेल, हा प्रश्न आहे. कारण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना अजून मिळालेला नाही. साडेतीन महिने झाले तरी ५० टक्के शेतकऱ्यांचीही कर्जमाफी झालेली नाही. विशेष म्हणजे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात म्हणताना एकूण किती शेतकऱ्यांना हे पैसे मिळतील, त्यासाठी किती रकमेची तजवीज करावी लागेल, याबाबत सरकारने काहीही स्पष्ट केलेले नाही. यंदा शेतीतून काहीही उत्पादन होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे, शिवाय हातात पैसे नसल्याने शेतकऱ्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचाही मोठा प्रश्न आहे. धरणात पाण्याचा जो काही साठा आहे त्याचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करायचा आहे. म्हणजे पुढील वर्षी जून-जुलैपर्यंत दुष्काळातून डोके बाहेर येण्याची काहीही शक्यता नाही. सध्या साखरेपासून धान्य, कडधान्याचे भाव प्रचंड वाढले आहेत. पिकलेच नाही तर विकणार काय, त्यामुळे धान्य-कडधान्याचे दर वाढत आहेत. म्हणूनच सरकार ५ हजार रुपयांची दिवाळीसाठी करत असलेली मदत खुपच तुटपुंजी आहे.

शेतकरी कुटुंब अवघ्या ५ हजार रुपयांत दिवाळीचे दिवस आनंदाने ढकलू शकेल, असे सरकारला वाटत असेल तर आपण कुठल्या जगात वावरत आहोत, याचा सरकारनेच विचार करावा. आधीच लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर प्रचंड ताण आहे. अशातच राज्य दुष्काळाच्या खाईत सापडले आहे. त्यातच कंत्राटदारांची ९६ हजार कोटींची थकबाकी सरकार कशी देणार, याचे चित्र स्पष्ट नाही. त्यांना पैसे मिळत नसल्याने कंत्राटदार आत्महत्या करू लागले आहेत. हे कमी म्हणून की काय सरकारने जाहीर केलेल्या २ लाख रुपयांपर्यंतच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा अजून सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना फायदा झालेला नाही. सरकारने ही योजना यंदा जुलैपासून लागू केली. आतापर्यंत २४ लाख ६७ हजार लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यातील १५ लाख ८५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १३ हजार २७५ कोटी रुपये जमा केले आहेत. २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना दुष्काळातही कर्जफेड करावी लागणार आहे.म्हणजेच शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस आणखी बिघडत जाणार आहे. त्यामुळे सर्व लाभार्थी शेतकऱ्यांची कर्जमाफी होईपर्यंत पुढचा खरीप हंगाम येऊ नये, एवढेच आता सरकारला सांगावेसे वाटते. त्यातच अवघ्या ५ हजार रुपयांत शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करायची, याचा विचार सरकार करणार आहे की नाही?

महागाईचा दर लक्षात घेतला तर एका ५ किंवा ६ जणांच्या शेतकरी कुटुंबाचा फराळ तरी पाच हजार रुपयांत होऊ शकतो का, याचा बजेट मांडणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी अंदाज घेतला असता तर बरे झाले असते. तरीही सरकार म्हणून आपण संवेदनशील असल्याचे दाखवले जात आहे. पण भाजपचेच जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे नाचगाण्यात मश्गुल असलेले व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे सत्ताधाऱ्यांना खरोखरच दुष्काळाचे गांभीर्य आहे का? आणि असेल तर नाचगाण्यात रमणाऱ्या आणि नोटांची उधळण झेलत नाचणाऱ्या कैलास गोरंट्याल यांच्यावर भाजप कारवाई करणार का, हाच खरा प्रश्न आहे. राज्यात भीषण दुष्काळ, त्यातच वाढणारी उष्णता आणि पाण्याचे वेगाने होणारे बाष्पीभवन यामुळे पाणीटंचाईची मोठी समस्या आ वासून उभी राहणार आहे. यंदा पहिल्या सहा महिन्यांत राज्यात बाराशेहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर एकट्या मराठवाडा विभागात सप्टेंबरपर्यंत ६६२ शेतकऱ्यांनी आयुष्य संपवले आहे. आता तर परिस्थिती आणखी भीषण आणि चिंताजनक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना धीर देतानाच आपण त्यांच्या पाठीशी नाही तर सोबत आहोत, हे सरकारला दाखवून देण्याची गरज आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढू शकतात, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही.

▌ शिवाजी चौगुले

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.१७.१०.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो,अश्विन मासे,शुक्ल पक्षे,सप्तमी तिथी,अहोरात्र,मूळ नक्षत्र,९.४७ नंतर पूर्वाषाढा नक्षत्र,धनु रास,अतिगंड योग,२३.०३ नंतर सुकर्मा योग, गरज करण, १९.१२ नंतर वणिज करण, दिनमान ११.३९, सुर्योदय ६.२९, सुर्यास्त १८.०८ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी ९ ते १०.३०, रवि तुळ राशीत प्रवेश, १९.५३ वा. शुक्रास्त, ज्योतिर्लिंग जागर करविरे, पुजा वंध्यत्व दोष परीहायार्थ आवाहानांग भूतं पूजन.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**–चांगल्या कामासाठी उशीर झाला तरी चालेल; परंतु घाई-गडबड करू नका. प्रत्येक गोष्टीत आपले तेच खरे करू नका. समोरच्याचेही ऐकून घेण्याची मानसिकता ठेवा.

**वृषभ**– नोकरदारवर्गाने आपल्या कामाकडे लक्ष द्यावे. खर्च कमी करा.जोडीदाराच्या सल्ल्याने पुढे जा.आर्थिक गुंतवणूक करणे सोयीस्कर ठरेल.

**मिथून**–हार न मानता जे प्रयत्न करीत आहात ते सोडू नका. त्या प्रयत्नांना नक्कीच यश मिळेल.व्यापार वाढवण्याच्या दृष्टीकोणातून चांगले निर्णय घ्याल.

**कर्क**–काही गोष्टी तुम्हाला न पटणाऱ्या घडतील. आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.व्यवसायात आर्थिक लाभ होईल.

**सिंह**–नोकरदार वर्गाला कामांमध्ये लक्ष घालता येईल. पैशाशी संबंधित बाबींमध्ये सकारात्मक परिणाम मिळण्याची शक्यता आहे. कामानिमित्त प्रवास घडेल.

**कन्या**–इतरांचे मार्गदर्शन लाखमोलाचे ठरेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण चांगले राहील.आज नियोजित पद्धतीने काम करणे तुमच्यासाठी सर्वात फायदेशीर ठरेल.

**तुळ**–आज तुमच्या प्रयत्नांना चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे.आर्थिक काटकसर करा.नवीन भागीदारीच्या व्यवसायासाठी वेळ अनुकूल असेल.

**वृश्चिक**–व्यवसायात खरेदी-विक्रीचे व्यवहार करू नका. नोकरदार वर्गाने वरिष्ठांचे मत विचारात घ्यावे.आर्थिक गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे.

**धनु**–व्यवसायात काम करत असताना मनामध्ये नकारात्मक भूमिका येऊ देऊ नका. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे मार्गदर्शन चांगले मिळेल. आर्थिक व्यवहार जपून करा.

**मकर**–काम करत असताना कोणावर अवलंबून राहू नका. तुम्हाला व्यवसायाच्या संदर्भात प्रवास करावा लागू शकतो. तुमच्या शब्दांना लोकांमध्ये महत्त्व मिळेल.

**कुंभ**–व्यवसायाशी संबंधित कामात येणारे लहान अडथळे मनाचे लक्ष विचलित करू शकतात.महत्त्वाच्या कामात वडीलधाऱ्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**मीन**–आपल्या कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींना महत्त्व देऊ नका.वैयक्तिक गोष्टी कोणासमोर सांगत बसू नका.बेकायदेशीर गोष्टींपासून लांब राहा.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### अनोळखी नंबरवरुन फोन करणाऱ्यांना आता वेसण बसणार?

अनोळखी नंबरवरून येणारे फोन कॉल हे अनेकदा कटकटीचे ठरतात. कधी स्पॅम तर कधी नको असलेल्या व्यक्तींचे फोन असतात. सद्या नाव दिसत नसल्याने असे फोन कॉल उचलावे लागतात. कधी कधी आपल्याच ओळखीची व्यक्ती तिच्याकडील नव्या नंबरवरून फोन करते तेव्हा आपला गोंधळ उडतो. मात्र आता असं काही होणार नाही. त्याचं कारण म्हणजे आता मोबाईलची रिंग वाजताच कुणाचा फोन आला आहे हे आपल्याला कळणार आहे दूरसंचार विभागाच्या नवीन नियमानुसार, १ नोव्हेंबर २०२६ पासून मोबाईलवर येणाऱ्या प्रत्येक कॉलवर कॉल करणाऱ्या व्यक्तीचे मूळ केवायसी रजिस्टर्ड नाव स्क्रीनवर दिसणार आहे. केंद्र सरकारने युनिफाइड लायसन्समध्ये बदल करून कॉलिंग नेम प्रेझेंटेशन सेवा लागू करण्याचे आदेश दिले आहेत तो निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल कारण आजकाल अनोळखी, स्पॅम आणि फसवणुकीचे कॉल्स येत असतात त्यामुळे यातून वेळ, पैसा आणि मानसिक तणावाला सामोरे जावे लागते तसेच या नवीन नियमांमुळे गुन्हेगारीवर थोडाफार अंकुश बसेल असे वाटते. जिओ,एअरटेल, व्होडाफोन आणि बीएसएनएल या सर्व कंपन्यांच्या ४जी आणि ५जी नेटवर्कवर हा नियम लागू होईल. सिम कार्ड खरेदी करताना दिलेल्या केवायसी फॉर्म आणि कागदपत्रांनुसार जे नाव नोंदवले आहे, तेच स्क्रीनवर दाखवले जाईल. यामुळे अनोळखी नंबरवरून येणारे स्पॅम आणि फसवणुकीचे कॉल्स ओळखणे सोपे होईल आणि ट्रूकॉलर सारख्या थर्ड-पार्टी ॲप्सवरील अवलंबित्व कमी होईल भारताबाहेरील क्रमांकावरून कॉल आल्यास स्क्रीनवर स्पष्टपणे इंटरनॅशनल कॉल असा उल्लेख दिसणार असला तरी जे नंबर दुसऱ्याच्या नावांवर रजिस्टर आहेत पण सध्या बंद आहेत ते सिम कार्ड दुकानवाल्यांनी चालू करुन ग्राहकांच्या माथी मारले आहेत त्याचे काय होणारं?

▌ राजू जाधव, मांगूर

## गरिबीच्या दृष्टचक्रातील संघर्षमय जीवन

जागतिक असमानता अहवाल २०२६ नुसार, देशातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या १० टक्के लोकसंख्येकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा ५८ टक्के हिस्सा आणि राष्ट्रीय संपत्तीचा ६५ टक्के हिस्सा आहे. याउलट, सर्वात खालच्या आर्थिक स्तरातील ५० टक्के लोकसंख्येच्या वाट्याला राष्ट्रीय उत्पन्नातील केवळ १५ टक्के हिस्सा येतो. देशातील सर्वाधिक श्रीमंत एक टक्का लोकांकडे एकूण राष्ट्रीय संपत्तीपैकी जवळपास ४० टक्के संपत्ती आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या माहितीनुसार, जागतिक लैंगिक अंतर निर्देशांक २०२६ मध्ये भारत १४५ देशांमध्ये १३१व्या स्थानावर आहे. दरवर्षी १७ ऑक्टोबर रोजी गरिबी निर्मूलनाविषयी जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात 'आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन' साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२६ या वर्षासाठी 'सर्वांसाठी सुरक्षित घर'ही संकल्पना निश्चित केली आहे. गरिबीमुळे लोकांचा बहुतांश वेळ दोन वेळच्या अन्नाची व्यवस्था करण्यातच खर्च होतो.त्यामुळे त्यांना घर, कुटुंब आणि मुलांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही. आरोग्य, शिक्षण, भविष्याची सुरक्षितता आणि लोककल्याणकारी योजनांविषयीही त्यांच्यामध्ये पुरेशी जागरूकता नसते. अनेक राजकीय पक्षांनाही निवडणुकीच्या काळातच गरीबांची आठवण होते. त्यावेळी त्यांच्याशी केलेली मोठमोठी आश्वासने कालांतराने विसरली जातात. गरिबीत जन्मलेले मूल स्वतःला गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी असंख्य संघर्षांना सामोरे जाते. आपल्या पुढील पिढीला चांगले जीवनमान मिळावे, यासाठी ते प्रयत्नशील असते; मात्र मोजक्याच लोकांना या संघर्षात यश मिळते. ज्या देशात प्रगत आरोग्यसेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था आणि पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध असतो, तसेच या मुलभूत सुविधांसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी दिली जाते, तो देश प्रगतीच्या मार्गावर असतो. अशी परिस्थिती भारतात निर्माण झाली, तर गरिबीचे समूळ उच्चाटन करणे शक्य होऊ शकते. देशात केवळ योजनांचे लाभार्थी निर्माण करण्याऐवजी सक्षम, स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक घडविण्यावर भर दिला पाहिजे.

▌ डॉ.प्रितम गेडाम

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# पाणी वापरावर पाटबंधारे विभागाकडून कडक नियमावली

## पिण्याच्या पाण्याला प्राधान्य; ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणी पुरवण्याचे नियोजन

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–

**जागतिक हवामान बदलाच्या आणि अल निनोच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या संभाव्य दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने आत्तापासूनच कडक पावले उचलली आहेत. राज्य शासनाच्या ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर) यांनी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध जलसाठ्याचे अत्यंत काटकसरीने, प्राधान्यक्रमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी अधिकृत जाहीर आवाहन व नियमावली प्रसिद्ध केली आहे.**



या काळात पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.सन २०२६-२७ या कालावधीत जास्त पाणी लागणारी कोणतीही नवीन बारमाही अथवा नगदी पिके घेऊ नयेत. अशी नवीन पिके घेतल्यास त्यांना पाणी पुरवण्याची जबाबदारी पाटबंधारे विभागाची असणार नाही.सध्या शेतात उभ्या असलेल्या बारमाही पिकांची नोंदणी आवश्यक कागदपत्रांसह ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत संबंधित शाखा कार्यालयात करणे बंधनकारक आहे.

ऊसासारख्या पिकाला ठिबक संच बसविल्याची खात्री करूनच मर्यादित स्वरूपात मंजुरी दिली जाईल. रब्बी व कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांना प्राधान्य दिले जाईल.अनधिकृत किंवा विनापरवाना पाणी उपसा करणाऱ्यांच्या मोटारी, पाईपलाईन आणि इतर साहित्य थेट जप्त केले जाईल आणि संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

महानगरपालिका, सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींनी विशेष मोहीम राबवून पाणी वितरण नलिकांची (पाईपलाईन) गळती त्वरित थांबवावी.सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवून सार्वजनिक बागा, उद्याने, आणि रस्ता दुभाजकांसाठी केवळ प्रक्रिया केलेलेच पाणी वापरावे. नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करावी.

औद्योगिक क्षेत्रातील सर्व उद्योगांनी त्यांच्या एकूण पाणी वापरापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पिण्यायोग्य पाण्याचा वापर इतर औद्योगिक कामांसाठी करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. संभाव्य जलसंकट टाळण्यासाठी सर्व घटकांनी या नियमांचे काटेकोर पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे उपकार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

# डिसेंबरअखेरपर्यंत कर्नाटकात १७ हजार शिक्षकांची भरती

बेंगळुरू,ता.१६(प्रतिनिधी)–

**येत्या डिसेंबरअखेरपर्यंत राज्यात १७ हजार शालेय शिक्षकांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक व माध्यमिक शिक्षणमंत्री मधु बंगारप्पा यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.**



यावेळी मंत्री बंगारप्पा म्हणाले, या भरतीमुळे शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर होण्यास मदत होणार आहे. भाजपच्या सत्ताकाळात प्रलंबित राहिलेल्या १३ हजार ५०० शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. शिवाय अनुदानित शाळांमध्ये ६ हजार शिक्षकांची भरती करण्यासाठी अर्थ विभागाने मंजुरी दिली आहे.काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यानंतर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाला अधिक प्राधान्य देण्यात येत आहे.

सरकारी शाळांचे पब्लिक स्कूलमध्ये रुपांतर करण्यासाठीही आम्ही मोठे पाऊल उचलले आहे. खासगी भागीदारीतून सरकार अधिकाधिक पब्लिक स्कूल सुरु करत असून ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक स्तरापासूनच इंग्रजी शिक्षण देण्यावर विशेष भर दिला जात आहे.

उच्च शिक्षण व रोजगारामध्ये ग्रामीण भागातील मुलांना अधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सरकार पब्लिक स्कूलना प्राधान्य देत आहे.सिद्धरामय्या यांच्या सरकारच्या काळात तसेच विद्यमान मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार यांच्या कार्यकाळातही आरोग्य व शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. सरकारकडून सर्व सुविधा उपलब्ध करुन देऊनही ग्रामीण भागातील मुलांचा सरकारी शाळांमधील प्रवेश लक्षणीयरीत्या घटला होता.

सरकारी शाळांमध्ये मुलांची संख्या वाढवण्याच्या उद्देशाने शिक्षण व रोजगारामध्ये ७.५ टक्केआरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारच्या या निर्णयांमुळे शिक्षणाचा दर्जा सुधारला असून एसएसएलसी व पीयूसी परीक्षांमध्ये अधिक संख्येने विद्यार्थी उत्तीर्ण होण्यास मदत झाली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



निपाणीकर राजवाड्यामध्ये अंबामातेची झोपाळ्यावर झोला घेतानाची बांधलेली पूजा.

# बोरगाव नगरपंचायत अधिकाऱ्यांची मनमानी

## गाळेधारकांचा आरोप

बोरगाव,ता.१६(प्रतिनिधी)–

**बोरगाव सर्कल वरील गाळे भाडे वाढवण्यास आमचा कोणताच विरोध नव्हता ,आपण भाडे जमा करण्यासाठी पैसे घेऊन गेलो असतानाही पैसे भरून घेण्यास नगरपंचायत अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केली.**



नगराध्यक्ष दिगंबर कांबळे यांना निवेदन देताना गाळेधारक शिशीर सातपुते, विद्याधर अम्मान्नावर व इतर.

सध्या दसरा, बोरगाव उरूस व दिवाळी हे सण तोंडावर असताना सुद्धा गाळे सील बंद करून आमच्या पोटावर मारण्याचा डाव नगरपंचायत अधिकाऱ्यांनी केला असल्याचा आरोप सर्वच गाळेधारकांनी केला.याबाबत गाळेधारक शिशिर सातपुते व विद्याधर अम्मान्नावर म्हणाले, शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी गावातच आपला व्यवसाय करीत उदरनिर्वाह चालवावा या उद्देशाने सन १९९७- ९८ व सन २००१-०२ या सालात बोरगाव सर्कल येथे दहा व्यापारी गाळे बांधण्यात आले. ग्रामपंचायत असताना गाळ्यांचे भाडे कमी होते. नंतर नगरपंचायत झाली, शहराचे विस्तारीकरण झाले, यात भाडे वाढ व्हावे,अशी मागणीही झाली. यासाठी आपण सर्वांनी भाडे वाढवून देण्यास तयार होतो.पण काही तांत्रिक बाबीही होत्या, यामध्ये गाळ्यांचे डागडूजीकरण होणेही गरजेचे होते. अशी मागणी आपण नगरपंचायत अधिकाऱ्यांना केली आहे. थकबाकी भरून आपण सर्व सहकार्य केले आहे.भाडेवाढ झाल्यास नक्कीच नगरपंचायतीच्या उत्पन्नातही वाढ होते यात आमचा कोणताच विरोध नाही.भाडेवाढ होताना काही बाबींचा विचार करावा यासाठी आपण जिल्हाधिकारी यांना निवेदन ही दिले आहे. मात्र नगरपंचायत अधिकाऱ्यांनी आम्हाला कोणतीच पूर्वकल्पना न देता काल अचानक येऊन सीलबंद केले. यात व्यापारांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे.काही हॉटेल व बेकरी व्यावसायिक,किराणा दुकानदार सलून दुकानदार आणि गॅरेज दुकानदार आहेत.

ऐन सणासुदीत गाळेधारकांचे मोठे नुकसान होत आहे.यासाठी आपणास न्याय मिळावा,अशी अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्यावर झालेला अन्याय दूर करून न्याय द्यावा, या मागणीचे निवेदन आज बोरगाव नगराध्यक्ष दिगंबर कांबळे यांच्याकडे सर्वच गाळेधारकांनी दिले.याप्रसंगी गाळेधारक शितल पाटील,शिशिर सातपुते, विद्याधर अम्मान्नावर, सुनील गुंडे, बाहुबली अम्मान्नवर, रामदास साळुंखे,संजय शिंगे,राजू भोजे पाटील, अभिजीत पाटील उपस्थित होते.

# संस्कार बाजारात विकत मिळत नाहीत-कल्पना रायजाधव

बारवाड,ता.१६(वार्ताहर)–

**प्रत्येक महिलेने चांगल्या संस्कारांची जोपासना करून आपल्या मुलांवरही चांगले संस्कार केले पाहिजेत.संस्कार हे बाजारात विकत मिळत नाहीत.ते आपणच निर्माण करायचे असतात असे मत कारदगा डी.एस. नाडगे हायस्कूलच्या शिक्षिका कल्पना रायजाधव यांनी व्यक्त केले.**



कुन्नूर येथील अन्नपूर्णा महिला सहकार संघ व क्रांतिवीर नवरात्रोत्सव तरुण मंडळाच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या नारी शक्तीचा सन्मान सोहळ्यात कल्पना रायजाधव यांनी वरील मत व्यक्त केले.यावेळी अध्यक्षस्थानी कोगनोळी येथील आनंद फौंडेशनच्या संचालिका शुभांगी खोत या होत्या.

धनाजी हुजरे यांनी स्वागत तर प्रास्ताविक मिनाक्षी तावदारे यांनी केले.त्यानंतर शुभांगी पवार,डॉ.रेखा पाटील, सुषमा बटकडली, पूनम पाटील,डॉ.तृप्ती भोसले,कल्पना रायजाधव यांना पुरस्कार देऊन तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कार करून गौरविण्यात आले.

यावेळी महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धेमधील यशस्वी स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी अन्नपूर्णा महिला संघाच्या उपाध्यक्षा रंजना कदम, क्रांतिवीर नवरात्र मंडळाचे उपाध्यक्ष सुनील हेळवाडे, अंजली शेटके यांच्यासह कुन्नूर, मांगूर, बारवाड, गजबरवाडी येथील महिला,अन्नपूर्णा महिला संघाच्या संचालिका, क्रांतिवीर नवरात्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश कदम यांनी केले.

# श्री पंत महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

**संत श्री पंत महाराज बाळेकुंद्री यांचा १२१ वा पुण्यतिथी उत्सव ता.२७ ते ता.२९ ऑक्टोबरदरम्यान श्री क्षेत्र पंतबाळेकुंद्री येथे विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.**



उत्सवाच्या पहिल्या दिवशी ता.२७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता बेळगाव येथील श्रीपंत वाडा येथून मिरवणुक निघेल. दुपारी २ वाजेपर्यंत ही मिरवणूक श्री क्षेत्र पंतबाळेकुंद्री येथील पंतवाड्यात पोहोचेल.२८ रोजी पहाटे ५ वाजता श्रीपुण्यस्मरण कार्यक्रम होईल. रात्री ८ ते १२ या वेळेत पालखी सेवा होईल. उत्सवाच्या सांगता दिनी ता.२९ रोजी दुपारी १२ वाजता श्रींचा महाप्रसाद होईल. दुपारी ३ ते ५ या वेळेत प्रेमानंद टिपरी कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ वाजता श्रींची पालखी आमराईतील पूज्यस्थानी जाईल आणि त्यानंतर गावातील श्रीपंत वाड्यात पालखी पोहोचल्यावर उत्सवाची सांगता होईल. सर्व भक्तांनी उत्सवात सहभागी होऊन सेवेचा लाभ घ्यावा,असे आवाहन अध्यक्ष श्री राजन पंतबाळेकुंद्री, श्री दत्त संस्थान,पंतबाळेकुंद्री व उत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्रांतीवीर रायण्णा पुतळा सुशोभीकरण कामाची प्रशासनाकडून पाहणी

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

**पालकमंत्री सतीश जारकीहोळी यानी मंजुर केलेल्या ३.२५ लाख निधीतुन सर्कलचा सर्वांगीण विकास होणार आहे.स्थानिक कोर्टाजवळील संगोळ्ळी रायण्णा सर्कल येथे उभारण्यात येणारा क्रांतीवीर संगोळी रायण्णा पुतळा आणि सर्कलच्या सुशोभीकरण कामाला गती आली आहे.**



निपाणी:संगोळ्ळी रायण्णा पुतळा जागेची पाहणी करताना लक्ष्मणराव चिंगळे,आयुक्त गणपती पाटील व इतर.

या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यापूर्वी आज संबंधित प्रशासकीय अधिकारी, कंत्राटदार आणि लोकप्रतिनिधींनी जागेची संयुक्त पाहणी केली.या पाहणी दौऱ्यात कामाची पुढील रूपरेषा आणि नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी भंडारकर, आयुक्त गणपती पाटील, मुख्य कंत्राटदार रोहन कोठीवाले उपस्थित होते.त्यांनी जागेच्या तांत्रिक बाबींची तपासणी केली.जिल्हा काँग्रेस अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे यांनी या संपूर्ण जागेची पाहणी करून, चौकातील कामाची सुरुवात कधी करायची आणि वाहतुकीला अडथळा न ठरता हे काम कशाप्रकारे वेळेत पूर्ण करता येईल,याविषयी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.भव्य आणि आकर्षक स्वरूपात हे सर्कल विकसित करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी दीपक सावंत, प्रतीक शहा, लोकेश गस्ते, समीर काझी, फारुख पटेल यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# गॅस कंपनी, वितरक पोर्टींग करण्यास मंजुरी द्यावी

## ग्राहक पंचायतीची पेट्रोलियम मंत्र्यांकडे मागणी

गारगोटी,ता.१६(प्रतिनिधी)–

**उज्ज्वला गॅस योजनेसह सर्व एलपीजी ग्राहकांवरील एरिया रीस्ट्रिक्शन दूर करणे,पूर्ण जिल्ह्यातील वितरकांचे गॅस सिलेंडरचे अधिकृत दर एकसमान करून दर महिन्याला प्रसिद्ध करणे आणि गॅस कंपनी किंवा वितरक पोर्टिंग करण्याची सेवा उपलब्ध करावी,अशी मागणी ग्राहक पंचायतचे प्रशांत पुजारी यांनी पेट्रोलियम मंत्री यांच्याकडे केली आहे.**

ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अन्वये ग्राहकांच्या विविध हक्कांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये वस्तू/सेवांची गुणवत्ता, प्रमाण, किंमत याबाबत माहिती मिळण्याचा हक्क, शक्य असेल तेथे विविध वस्तू/सेवा स्पर्धात्मक किंमतीत उपलब्ध होण्याचा हक्क, ग्राहकांचे म्हणणे ऐकले जाण्याचा हक्क यांचा समावेश आहे. सदर कायदेशीर तरतुदींच्या पार्श्वभूमीवर शासन व संबंधित सर्व एलपीजी कंपन्यांनी प्रधानमंत्री उज्ज्वला एलपीजी घरगुती ग्राहकांवरील एरिया रीस्ट्रिक्शनची अट शिथिल/रद्द करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण सध्या



अनेक ठिकाणी ग्राहक उज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून गॅस कंपनी वितरकाच्या कार्यक्षेत्राशी जोडलेले असतात. प्रत्यक्षात संबंधित वितरकाकडे सिलेंडर उपलब्ध नसणे, वितरणास विलंब होणे, ग्राहकाला तातडीने सिलेंडरची आवश्यकता असणे किंवा काही कारणास्तव संबंधित ग्राहक पत्ता बदलून दूर दुसऱ्या गावी निघून जाणे,अशा परिस्थितीत ग्राहकास जवळच्या दुसऱ्या अधिकृत वितरकाची सेवा सहजपणे घेता येणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांना त्यांच्या गरजेप्रमाणे आणि भौगोलिक अंतरामुळे होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन एलपीजी कंपनी आणि वितरक कडून रीफिल गॅस बदलून घेण्यासाठी विशेष पोर्टेबिलीटी सुविधा मिळावी. संपूर्ण जिल्ह्यात संबंधित सर्व एलपीजी कंपनीच्या सिलेंडरचा अधिकृत दर महिन्याच्या एक तारखेला पारदर्शकपणे जाहीर करावेत, अशी मागणी करण्यात आली.



मुरगूड येथे मंडलिक महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित कार्यक्रमात बोलताना प्रा.पी.एस.पाटील.

# मंडलिक महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

मुरगूड,ता.१६(प्रतिनिधी)–

**सर्जा-राजा ही कथा ग्रामीण जीवनाच्या वास्तवाचा वेध घेणारी कथा आहे. या कथेमध्ये ग्रामीण जीवनातील शेतकरी कुटुंबाच्या संघर्षाची कहाणी येते,असे प्रतिपादन साहित्यिक प्रा. पी. एस. पाटील यांनी केले.**

ते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन निमित्त वाङ्मय मंडळाच्यावतीने आयोजित केलेल्या माझे कथाकथन या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अर्जुन कुंभार उपस्थित होते. स्वागत डॉ.सुखदेव एकल यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.सौ.एम.एस.पाटील यांनी केले.आभार डॉ.अशोक पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.अर्चना कांबळे यांनी केले.या प्रसंगी दादासाहेब सरदेसाई,दीपक साळुंखे,सोहम डाफळे, सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# नव्या विद्युत उपकेंद्रामुळे पाच गावची वीज समस्या मिटणार

## आम.शशिकला जोल्ले;कारदगा येथे ११० के.व्ही. विद्युत उपकेंद्र बांधकामाचे भूमिपूजन

कारदगा,ता.१६(प्रतिनिधी)–

**कारदगा पंचक्रोशीतील वीज समस्या मिटावी या उद्देशाने आपण तत्कालीन भाजप सरकार असताना कारदगा येथे ११० केव्ही विद्युत उपकेंद्र मंजूर करून घेतले होते. आज केंद्राच्या बांधकामाचे भूमिपूजन झाल्याने या भागातील जनतेला २४ तास वीज सेवा मिळणार आहे.**

हे उपकेंद्र शेतकरी कामगार, उद्योजक व नागरिकांना आधार केंद्र ठरणार आहे.कारण महापूर व नैसर्गिक आपत्तीमुळे वारंवार वीज समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत होता.आता हि समस्या कायमची मिटणार असून नागरिकांना हक्काची वीज मिळणार आहे . प्रधानमंत्री सुर्यघर मुक्त बिजली योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे प्रतिपादन आमदार शशिकला जोल्ले यांनी केले.

कारदगा (तालुका निपाणी) येथे २१ कोटी २३ लाख निधीतून माणकापूर, कसनाळ, ढोणेवाडी, कारदगा, बारवाड गावांसाठी मंजूर झालेल्या ११० के.व्ही.विद्युत उपकेंद्र बांधकामाच्या भूमिपूजन कार्यक्रमप्रसंगी आम.जोल्ले बोलत होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी खासदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले यांची उपस्थिती होती.



कारदगा येथे कुदळ मारुन कामाचा शुभारंभ करताना आम. शशिकला जोल्ले, बाजूला सुमित्रा उगळे, सुरेखा घाळे, व इतर

प्रारंभी आम.शशिकला जोल्ले व माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले यांच्या हस्ते ११० केव्ही विद्युत उपकेंद्राचा भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला.त्यानंतर आम.शशिकला जोल्ले व माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले यांचा भाजप कमिटीच्यावतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना अण्णासाहेब जोल्ले म्हणाले, नेहमीच आपण निपाणी मतदार संघाच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, महिला व सभासद शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.या योजनेचा फायदा सर्वांनी घ्यावा असे सांगितले.

यावेळी हालशुगरचे चेअरमन जयकुमार खोत, इंजिनिअर शिवाजी खरे, ग्रामीण भाजपा अध्यक्ष बाळासाहेब कदम, माजी जिल्हा पंचायत सदस्या सुमित्रा उगळे, माजी ग्रामपंचायत अध्यक्षा सुरेखा घाळे, माजी ग्रामपंचायत अध्यक्ष अरविंद खराडे यांनी आमदार शशिकला जोल्ले यांनी केलेल्या विकास कार्याचा आढावा घेतला.प्रारंभी स्वागत सुरज माळी यांनी तर प्रास्ताविक सुदीपसिंह उगळे यांनी केले.

यावेळी बिरेश्वर बँकेचे चेअरमन आप्पासाहेब जोल्ले, निपाणी शहर भाजपचे अध्यक्ष राजू गुंदेशा, पवन पाटील,नितेश खोत,देवाप्पा देवकते, लक्ष्मण पसारे, भरत भागाजे,राजू भदरगडे, चिमासो नाडगे,कार्यकारी अभियंता कृष्णाप्पा हंडगर,सुप्रभा बंडगर, वैशाली खराडे, एम.टी. अपन्नावर, सुधीर गुणघी, बसवराज पुजारी, नेमिनाथ नेमन्नावर, हालसिध्दनाथ साखर कारखान्याचे सर्व संचालक, ढोणेवाडी, बारवाड, कारदगा ,मांगुर येथील भाजपचे कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# हातकणंगलेला वगळल्याने नाराजी

## शेतकऱ्यांमधून लोकप्रतिनिधींवर तीव्र संताप

तारदाळ,ता.१६(वार्ताहर)-

**राज्य शासनाने १४ ऑक्टोबर रोजी राज्यातील आणखी ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला, ज्यात शेजारील शिरोळ तालुक्याचा समावेश आहे, मात्र यातून हातकणंगले तालुका वगळला आहे. अत्यल्प पावसामुळे पिके करपून गेलेल्या आणि विहिरी-कूपनलिका कोरड्या पडलेल्या इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील तारदाळ, खोतवाडी, कोरोची, कबनूर आणि लगतच्या हातकणंगले, मजले या गावांना पुन्हा एकदा दुष्काळी यादीतून वगळण्यात आल्याने शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

या संपूर्ण पट्ट्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. बळीराजाने कष्टाने उभी केलेली सोयाबीन, भुईमूग, ऊसाची रोपे पाण्याअभावी करपून गेली आहेत. त्यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. दुसरीकडे विहिरी व कूपनलिकांनी तळ गाठल्याने



पिण्याच्या पाण्याची भीषणता भयावह बनली आहे. प्रत्यक्षात दुष्काळसदृश्य परिस्थिती असतानाही कागदावर हातकणंगले तालुका सुजलाम-सुफलाम दाखवला जात असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.असे असताना मतदारसंघाचे नेतृत्व करणारे खासदार धैर्यशील माने, आमदार राहुल आवाडे आणि जिल्हा परिषद सदस्या सानिका पाटील-यड्रावकर यांनी शासन दरबारी या भागाची खरी, भयावह स्थिती प्रभावीपणे मांडली नसल्याने हातकणंगले तालुका दुसऱ्यांदा म्हणजे सुधारित यादीतही समाविष्ट झाला नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

शिरोळ तालुक्यात पाऊस कमी म्हणून तो दुष्काळी होऊ शकतो, तर तारदाळ, कोरोची, कबनूरमध्ये परिस्थिती त्यापेक्षाही वाईट असताना या गावांना का वगळले याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. जर शासनाच्या निकषात बसत नसेल तर लोकप्रतिनिधींनी विशेष बाब म्हणून या गावांचा सर्व्हे करून, पंचनामे करून अहवाल सादर करणे अपेक्षित होते. मात्र तसे न झाल्याने शेतकरी १२ सवलती आणि दिवाळीपूर्वीच्या ५००० रुपयांच्या मदतीपासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे इचलकरंजी मतदारसंघातील ही ६ गावे तातडीने दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कबनूर येथील दुर्गामाता दौडला वाढता प्रतिसाद

कबनूर,ता.१६(वार्ताहर)-

**शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान कबनूर यांच्या वतीने कबनूर येथे घटस्थापनेपासून सुरू झालेल्या दुर्गामाता दौडमध्ये दिवसेंदिवस युवकांचा सहभाग वाढत आहे. तसेच गावातील विविध भागामधील नागरिकांचा उत्साहपूर्ण वातावरणात प्रतिसाद लाभत आहे. दौडची सांगता दसरा या दिवशी मोठ्या उत्सवाने होणार आहे.**

दररोज पहाटे साडेपाच वाजता जागृत देवस्थान मारुती मंदिर येथील पटांगणात सर्व युवक एकत्र येतात. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, दुर्गामाता प्रतिमेचे पूजन तसेच ध्वज व शस्त्र पूजन केले जाते.



कबनूर येथील दुर्गामाता दौडमध्ये सहभागी धारकरी व नागरिक.

प्रेरणा मंत्र झाल्यावर सर्व युवक देवीचा जयजयकार करत निश्चित केलेल्या मार्गाने गावातील विविध भागांमधील असणाऱ्या मंदिरात व सार्वजनिक मंडळातील देवीच्या जवळ जाऊन सार्वजनिक आरती करतात. युवकांमध्ये देशभक्ती, राष्ट्रभक्ती, देव, देश व धर्म याबद्दल श्रद्धा निर्माण व्हावी असे मागणे मागतात.

दौडमध्ये युवक पारंपारिक वेशात डोक्यावर फेटा, पांढरी टोपी कपाळाला टिळा लावून सहभागी होतात. यावेळी देशभक्तीपर, राष्ट्रभक्तीपर, स्फूर्तीगीते, प्रेरणा गीते व श्लोक गायले जातात. देवीचा, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा जयजयकार केला जातो. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने दौड प्रत्येक भागात जाते. जागोजागी माता भगिनी आकर्षक रांगोळी काढतात. रस्त्याच्या दुतर्फा रांगोळी काढून हार फुले लावून सजावट करतात. सुवासिनी स्त्रिया ध्वजाला औक्षण करतात. फुलांची उधळण करून दौडचे स्वागत केले जाते. दौडच्या वेळी महिला व नागरिकांचा उत्साह मोठा असतो. दुर्गामाता दौड मारुती मंदिरसमोर येऊन ध्वज उतरवून ध्येय मंत्राने सांगता होते.



श्री बालाजी लायब्ररीत वाचन प्रेरणादिन कार्यक्रमात पुस्तकांचे वाचन करताना विद्यार्थी.

## श्री बालाजी लायब्ररीमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

इचलकरंजी,ता.१६-

**येथील श्री बालाजी लायब्ररीमध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय कोल्हापूर यांच्यामार्फत आयोजित केलेल्या भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.**

यावेळी प्रमुख पाहुणे भारत गिड्डे,श्री.रेंदाळकर,श्री.जावेद, ग्रंथालयाचे अध्यक्ष विजय बाबर तसेच संस्थेचे संस्थापक तथा नगरसेवक मदनराव कारंडे यांनी लायब्ररीमधील विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाकडे जास्त न वळता पुस्तकांचे महत्व पटवून दिले.अनेक पुस्तकांची पाहणी करुन अवांतर विषयावर चर्चा करुन श्री.कारंडे यांनी मार्गदर्शन केले.रामदास कोळी,शितल शहाणे यांनी आभार मानले.

## माने महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

पंढरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**मातोश्री सौ.सरुबाई माने विद्यालय व कला, शास्त्र कनिष्ठ महाविद्यालय भटुंबरे येथे भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन व विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला.**

याप्रसंगी अजयसिंह माने यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अशोकानंद राक्षे हे होते.यावेळी विशाल धट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विजय राऊत यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलताना युवराज चौगुले, शेजारी इतर शिक्षक वर्ग.

## दि न्यू हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन संपन्न

इचलकरंजी,ता.१६-

**दि न्यू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी या विद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन वाय.बी.चौगुले व मुख्याध्यापक बी.ए.कोळी यांच्या हस्ते करण्यात आले**

याप्रसंगी प्रमुख पाहुणे युवराज चौगुले यांनी वाचनामुळे माणसाच्या ज्ञानात भर पडून, विचार शक्तीचा विकास होतो आणि व्यक्तिमत्वाला योग्य दिशा मिळते. यासाठी पुस्तके ही विद्यार्थ्यांचे चांगले मित्र बनले पाहिजेत, असे सांगितले. प्रास्ताविक सौ.व्ही.पी.मोरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत ग्रंथपाल एम.आर.चोपडे यांनी केले. सुत्रसंचालन एस.आर.शिंदे यांनी तर व्ही.डी.सुतार यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमास पर्यवेक्षिका सौ.आर.एस.पाटील, सौ.ए.बी.चोरगे, विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

# बोरपाडळे आरोग्य केंद्रातर्फे आरोग्य शिबीर संपन्न

बोरपाडळे,ता.१६(प्रतिनिधी)-

**बोरपाडळे परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, सर्वसामान्य रुग्णांना वेळेत आजारांचे निदान करून योग्य उपचार मिळावेत तसेच ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने सेवा संकल्प अभियान अंतर्गत मोफत सर्वरोग निदान शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र बोरपाडळे यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते.**

या शिबिरामध्ये विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय सल्ला व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन कोडोली पोलीस



सर्व रोगनिदान शिबिराप्रसंगी डॉ.शंतनू कदम यांचा सत्कार करताना डॉ.शैलेंद्र गायकवाड,डॉ.सोनिया कदम आदी.

ठाण्याचे प्रशिक्षणार्थी डीवायएसपी श्रीकांत ठिकाणे व तालुका आरोग्यधिकारी डॉ.शैलेंद्र गायकवाड यांच्या हस्ते पार पडले. या शिबिरामध्ये एमएस सर्जन डॉ.शंतनू कदम, सीपीआर हॉस्पिटल, सनशाईन हॉस्पिटलचे एमडी मेडिसिन डॉ. ओंकार काकरे व डॉ.दीपक पाटील हॉस्पिटलचे नाक घसा तज्ञ डॉ.अक्षय डी.एस.,नेत्ररोग तज्ञ डॉ. तानाजी चव्हाण तसेच बोरपाडळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनिया कदम, डॉ. अजिंक्य पाटील यांनीही शिबिराच्या माध्यमातून आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी योगदान दिले.

प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरपाडळे अंतर्गत कर्मचारी उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शिबिरातील तपासणी व उपचार विषयक कामकाज पार पडले.

# अर्थपूर्ण आयुष्यासाठी ग्रंथ वाचन महत्त्वाचे

### - डॉ.विलास पाटील

कोतोली,ता.१६(प्रतिनिधी)-

**सध्या मोबाईलमुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे पण जगात विद्वत्तेला मागणी आहे. जगात विद्वत्तेचा सन्मान केला जातो म्हणून आपल्याकडे विद्वत्ता यावयाची असेल व आपले आयुष्य अर्थपूर्ण बनवायचे असेल तर ग्रंथ वाचन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सारथी पुणे येथील कार्यकारी अधिकारी (शिक्षण) डॉ.विलास पाटील यांनी केले.**

श्रीपतराव चौगुले आर्टस् अँण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत ग्रंथालय विभाग,एन.एस.एस.विभाग व



श्रीपतराव चौगुले कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना डॉ.विलास पाटील, व्यासपीठावर अन्य मान्यवर.

एन.सी.सी.विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'वाचन आणि समृद्ध जीवन' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी प्रतिमा पूजन डॉ.विलास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते. कार्यक्रमास संस्था सचिव शिवाजीराव पाटील, संस्था संचालक प्रा.वेदिका चौगुले, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रो.डॉ.बी.एन.रावण, सहसमन्वयक डॉ.एस.एस. कुरलीकर, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार, श्रीपतराव चौगुले, डॉ.संपदा पिसे यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अंनिसच्या कोल्हापूर अध्यक्षपदी डॉ.सुरज पवार यांची निवड

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-



**अंधश्रद्धा निर्मूलन समितीची कोल्हापूर शहराची कार्यकारिणी जाहिर झाली असून कॅन्सर सेंटरचे सुप्रसिद्ध कॅन्सर तज्ञ डॉ.सुरज पवार यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे.**

शैक्षणिक, सामाजिक, विज्ञानवादी पुरोगामी विचारांचे चळवळीतील कार्यकर्ते राजेश वरक यांची कार्याध्यक्षपदी,भारतीय माहिती अधिकार जनसंपर्क प्रमुख प्रशांत गोंधळी यांची सचिवपदी, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे राज्याचे नेते अनिल लवेकर यांची उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी ईश्वरा गायकवाड, जमीर मणेर, रंजना पाटोळे या तिघांची सहसचिवपदी, अनिल लवेकर, श्वेता परुळेकर, उमेश देसाई या तिघांची उपाध्यक्षपदी, तर भालचंद्र धोंगडे, प्रमोद सनदी, बाळू माळी यांची प्रसिद्धी प्रमुख, रमेश वडणगेकर व दत्तात्रय चौगुले या दोघांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. ॲड.योगेश सावंत यांची कायदेशीर सल्लागार म्हणून निवड करण्यात आली.

# मोठी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा-देशमुख

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**प्रत्येकाने आपल्या आयुष्यात मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी आजपासूनच प्रामाणिक प्रयत्नांना सुरुवात करावी.जीवनात मोठे पद मिळवणे, अधिकारी होणे किंवा यशाची उंची गाठणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी इंद्रजीत देशमुख यांनी केले.**

कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचलित देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, नाईट कॉलेज



व्याख्यानात बोलताना इंद्रजीत देशमुख, सोबत डॉ.विश्वनाथ मगदूम व इतर मान्यवर.

ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, अक्षरदालन आणि गुणिदास फाउंडेशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ.विश्वनाथ मगदूम हे होते.

श्री.देशमुख पुढे म्हणाले, यशातून आनंद मिळवणे आणि आपल्या आई-वडिलांना आपल्या यशाची बातमी सर्वप्रथम देण्याचा आनंद अनुभवणे हे अधिक मोलाचे आहे. त्यामुळे भविष्याची वाट पाहत न बसता, आपल्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी आजपासूनच प्रयत्नशील राहिले पाहिजे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी डी. आर. के. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. उत्तम पाटील यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १६/१०/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ वा.
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
बेशरमी
A कामसुख
दु. ४ व ७ वा.
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १६ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
A अ व्हिच स्टाईल A
फक्त प्रौढांसाठी

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअप ग्रुप
नवीन स्क्रीनसह फुल एचडी चित्रपटाचा आनंद घ्या
शुक्रवार दि.१६ पासून
रोज ३ खेळ १२-३ व ९.३० वा. | रोज १ खेळ ६ वा.


जेलर-२ (हिंदी)

दृश्यम-३ (हिंदी)
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
नवीन डॉल्बी डिजिटल साउंड सिस्टिम
शुक्रवार ता 16 पासून.
रोज 3 खेळ 12-3-9 वा. | रोज 1 खेळ सायं. 6 वा.

जेलर 2
JAILER2


सहल (मराठी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत गुरुवार ता.१५ पा
१२,३,६,९ वा


(हिंदी मध्ये)
जेलर २
भू. रजनीकांत, हितीक रोशन, विद्या बालन

गुरु
गुरुवार,ता.१५ पासून रोज ४ खेळ
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२*३०.३.३०*६.३०*९.३० वा.
सुपरस्टार रजनीकांतची जबरदस्त त्सुनामी येत आहे.


(हिंदी मध्ये)
जेलर २
भू. रजनीकांत, हितीक रोशन, विद्या बालन

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow


" जेलर 2 " ( हिंदी ) 10:00 AM, 01:30 PM 03:45 PM, 07:00 PM 10:30 PM
" नई नवेली " ( हिंदी ) 10:30 AM, 12:15 PM 08:00 PM
" स्ट्रीट फायटर " ( हिंदी ) 05:45 PM, 10:45 PM
" प्रहार " ( हिंदी ) 01:00 PM, 04:30 PM 10:15 PM
" दृश्यम 3 " ( हिंदी ) 02:45 PM, 07:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11


रजनी : द जेलर 2 (HIN) (U/A) 12.15pm, 03.45, 07.00, 10.15pm
प्रेमदा ऊरली (KAN) (U/A) 01.30, 07.30, 10.00pm
स्ट्रीट फायटर (HIN) (U/A) 11.00am
नई नवेली (HIN) (U/A) 01.15, 07.15pm
प्रहार (HIN) (U/A) 04.15pm
दृश्यम : द कन्कक्लुजन (HIN) (U/A) 10.30am, 04.30, 10.30pm
आता पहा मॉर्निंग शो 100 रु. पासून पुढे

# साखरेचा हमीभाव वाढवेपर्यंत कारखाने बंद ठेवा

## राजू शेट्टींचा आक्रमक पवित्रा; कारखान्यांचा कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**केंद्र सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टीयांनी आता प्रचंड आक्रमक पाऊल उचलले आहे.राष्ट्रीय महामार्ग रोको आंदोलन स्थगित केल्यानंतर, राजू शेट्टी यांनी आपला मोर्चा थेट सांगली आणि सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडे वळवला.दिवसभरात त्यांनी अनेक प्रमुख साखर कारखान्यांना थेट धडक देत काटा बंद आंदोलन पुकारले, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील साखर पट्ट्यात एकच खळबळ उडाली आहे. राजू शेट्टींच्या या आक्रमक पवित्र्यापुढे सर्वच कारखान्यांनी आपले कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.**


कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या दारात काटा बंद आंदोलन करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी.

राजू शेट्टी यांनी जिल्ह्यातील मातब्बर साखर कारखान्यांना लक्ष्य केले.य.मो कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या वजन काट्यावर स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांसह धडक मारत,जोपर्यंत केंद्र सरकार साखरेचा हमीभाव वाढवत नाही,तोपर्यंत कारखान्याचे धुराडे पेटू देणार नाही आणि सर्व कारखाने बंद ठेवणार, असा निर्धार राजू शेट्टी यांनी व्यक्त केला.

यावेळी कारखानदारांना आणि प्रशासनाला इशारा देताना राजू शेट्टी म्हणाले, ''चालू वर्षी शेतकरी केंद्र सरकारच्या अन्यायी धोरणांविरोधात रस्त्यावरची आरपारची लढाई लढत आहे. साखरेचा हमीभाव वाढला,तर या लढाईत शेतकऱ्यांपेक्षा जास्त फायदा खुद्द कारखानदारांचाच होणार आहे. त्यामुळे सर्व कारखानदारांनी कोणत्याही राजकीय किंवा शासकीय दबावाला बळी न पडता या आंदोलनाला जाहीर सहकार्य करावे. जर कोणी कारखाने सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, तर होणाऱ्या तीव्र नुकसानीची संपूर्ण जबाबदारी सर्वस्वी कारखान्यांची असेल.

यावेळी कृष्णाचे कार्यकारी संचालक बाजीराव सुतार,उपाध्यक्ष जी.डी.मोरे, स्वाभिमानी शेतकरी सघटनेचे भागवत जाधव, विश्वास कोळी, देवानद पाटील, सजय बेले,बाषुसाहेब साळुखे,बाबासाहेब साद्रे, सदीप राजोबा शहाजी पाटील, रविकिरण माने, प्रदीप नागरे, आकाश साळुखे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या सख्यने उपस्थित होते.

दरम्यान,केंद्र सरकार आता या शेतकरी आंदोलनापुढे नमते घेणार का?आणि साखरेचा हमीभाव वाढवणार का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# सांगली मनपाची पाणीपट्टीधारकांना ३१ ऑक्टोबरपर्यंत विलंब शुल्कातून सूट

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

**सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगर पालिकेच्या हद्दीतील पाणीपट्टी धारकांसाठी एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. पाणीपट्टीच्या बिलांवरील विलंब शुल्क व दंड व्याजास ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.ऑनलाईन बिल भरणा प्रणालीत निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.**




सांगली, मिरज आणि कुपवाड शहरातील सर्व नागरिक व पाणीपट्टीधारकांना चालू आर्थिक वर्ष २०२६-२०२७ मधील एप्रिल ते जुलै २०२६ या चार महिन्यांची पाणीपट्टीची बिले वितरीत करण्यात आली आहेत. नागरिकांना ही बिले घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने भरता यावीत,यासाठी महापालिकेकडून सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. परंतु, महापालिकेच्या संगणक विभागामार्फत राबवण्यात येत असलेली ऑनलाईन बिल भरणा प्रणाली अद्याप तांत्रिक कारणांमुळे पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे अनेक नागरिकांना पाणीपट्टीचा भरणा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता.

दरम्यान, प्रणालीतील तांत्रिक त्रुटींमुळे नागरिकांवर थकीत बिलांचा किंवा दंडाचा अतिरिक्त भार पडू नये आणि त्यांना बिल भरण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने प्रशासनाने ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क किंवा दंड व्याज न आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

> ''ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक त्रुटींमुळे नागरिकांना पाणीपट्टी भरताना अडचणी येत आहेत. त्यामुळे ३१ ऑक्टोबरपर्यंत विलंब शुल्क व दंड व्याजातून सवलत देण्यात आली आहे. सर्व नागरिक व पाणीपट्टीधारकांनी या कालावधीत आपल्या बिलांचा भरणा करून महापालिकेस सहकार्य करावे.''
>
> **-अश्विनी पाटील, उपायुक्त सांगली-मिरज-कुपवाड महापालिका**

# शेतकऱ्यांना सवलतींचा लाभ गतीने दिला जाणार

## ना.चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-



**जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. शासन निर्देशानुसार शेतकऱ्यांना विविध १२ आवश्यक सवलतींचा लाभ गतीने दिला जाणार आहे, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल,अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.**

सांगली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची गंभीर दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कवठेमहांकाळ व मिरज तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी सांगली जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आल्याचे सांगून, शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सर्व १२ सवलतींचा लाभ देण्यात येणार असल्याची ग्वाही दिली.

### अलकूड, तानंगमध्ये पाहणी

दुष्काळामुळे शेतीचे झालेले नुकसान पाहून पालकमंत्री श्री. पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. कवठेमहांकाळ व मिरज तालुक्यांतील अलकूड, तानंग, कानणवाडी आदी गावांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. अनेक शेतकऱ्यांनी पिकांची झालेली हानी, पाण्याची कमतरता आणि वाढत्या खर्चामुळे निर्माण झालेल्या अडचणी त्यांच्यासमोर मांडल्या. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेताना त्यांनी प्रत्येकाची आस्थेवाईकपणे चौकशी केली.

शेतकऱ्यांनी धीर सोडू नये.या कठीण काळात आम्ही खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. दुष्काळग्रस्तांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना एकटे सोडले जाणार नाही,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या सवलतींचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही गतीने करावी अशा सूचना श्री. पाटील यांनी दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी आमदार सुरेश खाडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष महेश खराडे, जिल्हा परिषद सदस्य आशिष जाधव, कवठेमहांकाळचे अध्यक्ष उदयराजे भोसले, अनिल लोंढे, श्रीकांत कांबळे, अनिल शेगुणशे यांच्यासह अन्य पदाधिकारी, महिला आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संशोधनाचा उपयोग समस्या सोडविण्यासाठी व्हावा

## डॉ.रजनीश कामत

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**पीएच.डी. संशोधनातून मिळणारे ज्ञान केवळ प्रबंध, प्रयोगशाळा किंवा ग्रंथालयापुरते मर्यादित राहू नये.संशोधनाचा उपयोग समाजातील प्रत्यक्ष समस्या सोडविण्यासाठी झाला पाहिजे. संशोधनातून पेटंट आणि पेटंटमधून प्रत्यक्ष उत्पादन निर्मितीपर्यंत पोहोचण्याची मानसिकता संशोधकांनी विकसित करावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.**



आरआयटीमध्ये पीएच. डी. पदवी प्राप्त प्राध्यापकांच्या वॉल ऑफ फेमच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवर.

येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरआयटी) संस्थेत १०० हून अधिक प्राध्यापक व संशोधकांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल आयोजित गौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव आर. डी. सावंत, राजारामबापू बँकेचे संचालक प्रा.शामराव पाटील, आरआयटीचे संचालक डॉ.पी. व्ही. कडोले यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरवात सर्व पीएच.डी. पदवी प्राप्त प्राध्यापकांच्या संशोधनामधील योगदानाची माहिती नमूद असलेल्या वॉल ऑफ फेमच्या उद्घाटनाने झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते या वॉल ऑफ फेमचे उद्घाटन झाले.

प्रारंभी कुलगुरू डॉ.रजनीश कामत यांच्याहस्ते वृक्ष रोपाला पाणी घालून गौरव समारंभाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सर्व विभागातील पीएच.डी.धारक प्रमुखांचा सन्मान करण्यात आला.

आरआयटीने १०० हून अधिक पीएच.डी.धारकांची शैक्षणिक कामगिरी साध्य केल्याबद्दल समाधान व्यक्त करत डॉ.कामत यांनी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, संशोधक आणि त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले.संशोधनाच्या क्षेत्रात संस्था भविष्यातही उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सर्व डीन्स, विभागप्रमुख, डॉक्टरेट प्राध्यापक वर्ग, रजिस्ट्रार सारिका पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश जाधव यांनी केले.समन्व्यक आणि पीएच. डी. कॉन्व्हेनॉर डॉ. आर. जी.देसावळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## पदवीधर, शिक्षक मतदार संघातील दोन्ही जागा जिंकणार-चव्हाण

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

**पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील या दोन्ही जागा महायुती म्हणून लढविल्या जात असून महायुतीतील तिनही पक्षांनी भाजपच्या अधिकृत उमेदवारांनाच पाठिंबा दिला आहे.त्यामुळे या दोन्ही जागा जिंकणार असल्याचा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगलीत व्यक्त केला.**

सांगलीत पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी घेतली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस पालकमंत्री चंद्रकांत पाटील,आ. सुरेश खाडे, आ. सुधीर गाडगीळ, आ.गोपीचंद पडळकर, शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, महापौर धीरज सूर्यवंशी,भाजपचे प्रदेश सचिव शरद लाड, जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्रीताई पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.श्री.चव्हाण म्हणाले, पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील उमेदवारीवरुन महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. सर्व नेत्यांमध्ये एकमत झालेले नाही. त्यामुळे दोन्ही जागा आम्ही जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## वासोटा किल्ला पर्यटनासाठी खुला

सातारा,ता.१६(प्रतिनिधी)-

**राज्यातील पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आणि सातारा जिल्ह्याचे पर्यटन वैभव असलेल्या ऐतिहासिक वासोटा किल्ल्याचा ट्रेक गुरुवार, ता.१५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरु झाला आहे.**

वासोटा दुर्गपर्यटन मार्ग प्रवेशापासूनच प्लास्टिक मुक्त झोन असून प्लास्टिकच्या वस्तूंवर पूर्णपणे बंदी आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात स्थित असलेला वासोटा व्याघ्रगड या ट्रेकचा दुर्गप्रेमी यांना आनंद घेता येणार आहे. तसेच वासोटा दुर्गपर्यटनासोबत सह्याद्री पर्वतरांगामधील शिवसागर जलाशयातील बोटींग, शेंबडी मठ, मुनावळे धबधबा,ठोसेघर धबधबा,कास पठार इ.निसर्गरम्य ठिकाणांचा पर्यटकांना आनंद घेता येणार असल्याचे मत सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण यांनी व्यक्त केले.

## आ.नायकवडींना धमकी पत्राची सखोल चौकशी करा-थोरात

मिरज,ता.१६(प्रतिनिधी)-

**मिरजचे आमदार इद्रीस नायकवडी यांना धमकीचे पत्र आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर माजी नगरसेवक योगेंद्र थोरात यांनी या प्रकरणावर प्रश्न उपस्थित केले आहेत. धमकीच्या पत्राची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी त्यांनी मिरज उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

आमदार नायकवडी यांच्यावर टीका करताना थोरात म्हणाले की, त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची मोठी फळी असताना पोलीस बंदोबस्ताची गरज का भासते? यापूर्वी ग्रामीण भागात दौऱ्यावर असताना आमदारांच्या वाहनाला दगड लागल्याच्या घटनेनंतर त्यांचा पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला होता.या बंदोबस्ताचा महापालिका निवडणुकीत फायदा घेतल्याचा आरोपही थोरात यांनी केला. धमकीचे पत्र खरे आहे की, बनावट याची पोलिसांनी सखोल चौकशी करावी. पोलीस बंदोबस्त वाढवून घेण्यासाठी हा प्रकार केला असण्याचा संशय असल्याचे थोरात यांनी सांगितले.मात्र, धमकीचे पत्र खरे असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

# शिराळ्यातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत

## नगराध्यक्ष नाईक यांची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

शिराळा,ता.१६(प्रतिनिधी)-

**शिराळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विकासकामांना गती देण्यासाठी आणि शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शिराळ्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथे भेट घेतली. यावेळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते. या भेटीदरम्यान शिराळा शहरातील विविध विकासकामे, प्रस्तावित योजना,प्रलंबित प्रश्न आणि आवश्यक निधी यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.**


उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव सादर करताना नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक.

शिराळा शहराच्या विविध भागांतील पायाभूत सुविधांचा विकास, नागरिकांच्या गरजांशी संबंधित प्रश्न,प्रस्तावित विकासकामे आणि शहराच्या भविष्यातील विकासाचा व्यापक आराखडा याबाबत नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासमोर विविध प्रस्ताव सादर केले. या कामांना प्रशासकीय स्तरावर गती मिळावी, विकास कामांमधील अडथळे दूर व्हावेत आणि शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शिराळा शहरासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी पाठपुरावा केला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शिराळा शहराच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांना दिली.तसेच शहराच्या आवश्यक विकासकामांसाठी पाठपुरावा करून निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सकारात्मक सहकार्य करण्याबाबत आश्वस्त केले.

# महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे

## गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी

औध,ता.१६(वार्ताहर)-

**महिलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळते. गौराई सजावट स्पर्धेसारख्या उपक्रमांमुळे महिलांच्या कलात्मकतेला वाव मिळण्याबरोबरच पारंपरिक संस्कृती आणि सण-उत्सवांची परंपराही जपली जाते, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद अध्यक्षा गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांनी केले.**



सिद्धेश्वर कुरोलीत गौराई सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी,मनीषा फडतरे,संदीप मांडवे आदी.

सिद्धेश्वर कुरोली येथे आयोजित गौराई सजावट स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. या स्पर्धेत महिलांनी गौराई सजावटीच्या माध्यमातून आपली कल्पकता, कलात्मकता आणि सर्जनशीलता सादर केली. या कार्यक्रमाला महिलांची लक्षणीय उपस्थिती लाभली.

स्पर्धेतील विजेत्यांमध्ये स्वाती बनसोडे यांनी प्रथम, सायली भोईटे यांनी द्वितीय, पायल खंडागळे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. रेवती काळे, योगिता देशमुख,राणी देशमुख आणि ऋतुजा देशमुख यांनी अनुक्रमे चौथा, पाचवा, सहावा व सातवा क्रमांक मिळविला.

या कार्यक्रमाला चारुशीलाराजे पंतप्रतिनिधी,हर्षिताराजे पंतप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य मनीषा फडतरे,संदीप मांडवे, शशिकला देशमुख, पंचायत समिती सदस्य मनोज देशमुख, शुभम शिंदे, सागर गुरव, राजेंद्र फडतरे, स्वप्नील बनसोडे, तानाजी देशमुख, संकेत जाधव, श्रीराम सातपुते, गणेश देशमुख, अब्बास आतार, वैभव हरिदास, प्रताप देशमुख, सोमनाथ साठे, सुनील मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## साताऱ्यात रविवारी दुर्गा सप्तशती पठण कार्यक्रम

सातारा,ता.१६(प्रतिनिधी)-

**येथील राजवाडा परिसरातील पंचपाळी हौद दुर्गामाता मंदिर ट्रस्टच्या वतीने नवरात्री उत्सवानिमित्त येत्या १८ ऑक्टोबर रोजी दुपारी एक ते चार या वेळेत साडेतीन शक्तीपीठाच्या देवतांपुढे महिलावर्ग दुर्गा सप्तशती स्तोत्राचे पठण करणार आहेत.**

सातारा येथील शनिवार पेठ येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र यांच्या सहकार्याने सातारा शहर परिसरातील सुमारे १,१०० महिला या दुर्गा सप्तशती स्तोत्र पठण सोहळ्यात सहभागी होणार आहेत, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय देशमुख यांनी दिली.या दुर्गा सप्तशती पठण कार्यक्रमात सातारा शहरातील ज्या देवी भक्तांना सहभागी व्हावयाचे असेल त्यांनी मंदिर ट्रस्टशी संपर्क साधावा. तसेच या पठण सोहळ्यात सहभागी होऊन आनंद घ्यावा, असे आवाहन मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'स्वाभिमानी'च्या ऊसदर आंदोलनाची धग वाढणार

## सांगली जिल्ह्यातील कारखान्यांवर धडक; मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

वाळवा,ता.१६(प्रतिनिधी)-

**साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ५० रुपये करावी, तसेच सी हेवी इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा, या प्रमुख मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सुरू केलेल्या ऊसदर आंदोलनाची धग आता आणखी वाढण्याची शक्यता आहे. ऊसदराच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी साखर कारखानदारांना कारखाने बंद ठेवण्याचे आवाहन केले असून, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.**

### क्रांती,सोनहिरा,हुतात्मा कारखान्यांना भेट


वाळवा येथे हुतात्मा कारखान्याच्या प्रशासनाला कारखाना बंद ठेवण्याची विनंती करताना राजू शेट्टी व शेतकरी वर्ग.

गेल्या पंधरा दिवसांपासून विविध साखर कारखान्यांच्या प्रशासनाला भेटून कारखाने बंद ठेवण्याची विनंती केली जात होती. मात्र, काही कारखाने सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर राजू शेट्टी यांनी सांगली जिल्ह्यातील क्रांती साखर कारखाना, सोनहिरा साखर कारखाना तसेच वाळवा येथील हुतात्मा साखर कारखान्याला भेट देऊन कारखाने बंद ठेवण्याची विनंती केली.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे उसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे उसाचे वजन आणि साखर उताऱ्यात घट होण्याची शक्यता असून, त्याचा फटका ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार या दोघांनाही बसू शकतो. ही बाब लक्षात घेऊन कारखान्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

हुतात्मा साखर कारखाना प्रशासनाशी झालेल्या चर्चेदरम्यान राजू शेट्टी यांनी आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली. कारखाने बंद ठेवण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

### ऊसदर जाहीर होईपर्यंत घाई करू नका!

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन करताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यांना पाठविण्याची घाई करू नये.ऊसदराचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत आणि दर जाहीर होईपर्यंत शेतकऱ्यांनी संयम राखावा. यंदा ऊसाला योग्य भाव मिळावा, यासाठी संघटना ठाम असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेतली जाणार नसल्याची भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान,हुतात्मा साखर कारखाना प्रशासनाने शेतकऱ्यांना सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संदीप राजोबा, भागवत जाधव, अनिल पवार,विश्वास कोळी, बाबा संद्रे,संजय बेले, संतोष शेळके, जगन्नाथ भोसले, प्रताप पाटील यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

साखरेची एमएसपी आणि सी हेवी इथेनॉलचा दर वाढविण्याच्या मागणीवर स्वाभिमानी शेतकरी संघटना ठाम आहे. त्यामुळे आगामी काळात ऊसदर आंदोलन कोणते वळण घेणार आणि केंद्र सरकार या मागण्यांवर काय भूमिका घेणार, याकडे राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महासत्ता, इचलकरंजी
# भविष्यज्ञान
पान १०
शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६

## दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर राशीनुसार खरेदी करा 'या' वस्तू; घरात सुख-समृद्धीची होईल बरसात

**साडेतीन** मुहूर्तांपैकी एक असलेला दसऱ्याचा सण हा अत्यंत शुभ मानला जातो. वाईटावर सत्याचा विजय म्हणून या दिवसाकडे पाहिलं जातं. तसेच, या दिवसाचे अनेकही अनेक संदर्भ आहेत. दसऱ्याचा दिवस खरेदीसाठी शुभ मानला जातो. त्यानुसार, या दिवशी राशीनुसार तुम्ही कोणत्या वस्तूंची खरेदी करावी हे या ठिकाणी आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

तुमच्या राशीनुसार 'या' वस्तू खरेदी करा

**मेष रास** – मेष राशीच्या लोकांनी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर शमीचं रोप खरेदी करु शकता. यामुळे तुमच्या जीवनातील गरिबी दूर होईल.

**वृषभ रास** – या दिवशी वृषभ राशीच्या लोकांनी वाहन खरेदी करणं शुभ ठरु शकतं. यामुळे तुमच्या घरात सुख-समृद्धी येईल.



**मिथुन रास** – या राशीच्या लोकांनी आजच्या दिवशी एखादे मातीचे भांडे खरेदी करणं शुभ ठरेल. यामुळे तुमच्या घरात बरकत टिकून राहील.

**कर्क रास** – कर्क राशीच्या लोकांनी आजच्या शुभ मुहूर्तावर पितळ्याचा कलश खरेदी करणं शुभ मानलं जातं. पितळ्याच्या कलशावर कुबेर वास करतो अशी पौराणिक मान्यता आहे.

**सिंह रास** – एखाद्या सणसमारंभाला सोन्या- चांदीची नाणी खरेदी करण्याची परंपरा आहे. त्यानुसार, दसऱ्याच्या दिवशी तुम्ही चांदीची नाणी खरेदी करु शकता.

**कन्या रास** – कन्या राशीच्या लोकांनी कामधेनु मूर्ती खरेदी करणं शुभ मानलं जाईल. कामधेनु ही इच्छा पूर्ण करणारी गाय म्हटलं जातं.

**तूळ रास** – तूळ राशीच्या लोकांनी आजच्या दिवशी तुळशीचं रोप लावावं. यामुळे तुमच्या घरातील नकारात्मकता दूर होऊन सकारात्मकता येईल.

**वृश्चिक रास**–या राशीच्या लोकांना चांदीच्या वस्तू फार लाभदायक ठरतात. त्यामुळे आजच्या दिवशी तुम्ही चांदीची भांडी, चांदीची नाणी यांसारख्या वस्तू खरेदी करु शकता.

**धनु रास** –या राशीच्या लोकांनी आजच्या दिवशी सोनं खरेदी करणं लाभदायक ठरणार आहे.

**मकर रास** –मकर राशीच्या लोकांवर देवी सरस्वतीची कृपा असल्यामुळे तुम्ही तुमच्या बुद्धिमत्तेत भर पडणाऱ्या गोष्टी खरेदी करु शकता.

**कुंभ रास** – या राशीच्या लोकांनी आजच्या दिवशी रुमाल किंवा एखादं कापड खरेदी करणं शुभ राहील.

**मीन रास** –दसऱ्याच्या दिवशी मीन राशीच्या लोकांनी भविष्याचा विचार करता पैशांची गुंतवणूक करणं फार शुभ मानलं जाणार आहे.

## शनिदोष कमी करण्यासाठी दसऱ्याला विशेष उपाय !



**साडे तीन** मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या दसऱ्याच्या दिवशी कुठलेही शुभ कार्य करण्यासाठी विशेष मुहूर्त बघावा लागत नाही. दसऱ्याच्या दिवशी अनेक उपाय केले जातात ज्यामुळे नकारात्मकता दूर होते आणि सुख-समृद्धीची प्राप्ती होते. ज्या लोकांच्या कुंडलीत शनि संबंधित कुठला दोष असेल, त्यांनी दसऱ्याच्या दिवशी काही विशेष उपाय केल्याने दोषांचे निवारण होते. या उपायांबद्दल माहिती करून घेऊया....

१. दसऱ्याला शनिदेव आणि बजरंगबली हनुमानाची पूजा

वैदिक ज्योतिष शास्त्रानुसार जे लोक बजरंगबली हनुमान यांचे भक्त असतात आणि नियमित हनुमान चालीसाचे पठण करतात त्यांना शनिदोष लागत नाही. जर तुमच्या कुंडलीत शनिदोष असेल तर दसऱ्याला बजरंगबली हनुमान आणि शनिदेवाची पूजा केल्याने सर्व दोषांचे निवारण होईल.

२. घरात शमीचे रोप लावून त्याची पूजा करा

ज्या लोकांच्या कुंडलीत शनि संबंधित कुठलेही दोष असतील त्यांनी दसऱ्याच्या दिवशी शमीचे पूजन करावे. याशिवाय घराच्या उत्तर पूर्व दिशेला शमीचे रोप लावावे. यामुळे कुंडलीतील शनि दोषामुळे होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते.

३. नारळाच्या उपायाने दूर करा शनिदोष

हिंदू धर्मात नारळाला शुभ मानतात. दसऱ्याच्या दिवशी रावण दहनाच्या वेळेस एक पाणी असणारा नारळ घ्या, त्याला एकवीसवेळा आपल्या डोक्यभावती ओवाळून अग्नीत टाकून द्या. या उपायामुळे शनिदोष दूर होतील आणि सुख-समृद्धीची प्राप्ती होईल.

४. तेलाचा दिवा लावा–ज्या लोकांच्या कुंडलीत शनिसंबंधित दोष आहे आणि ज्या लोकांना शनिची साडेसाती किंवा ढैय्या चालू आहे त्यांनी दसऱ्याच्या दिवशी मोहरीच्या तेलाचा दिवा लावल्याने त्रास, समस्या

५. रामचरितमानसचे पठण करा–जर कुंडलीत शनिदोष असेल तर त्याच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी दसऱ्याला घरात सुंदरकांड आणि रामचरितमानसाचे पठण करणे अत्यंत शुभ असल्याचे मानले जाते.

## फक्त ४५ मिनिटांचा दसऱ्याला शस्त्र पूजेचा शुभ मुहूर्त !

**दसरा** किंवा विजयादशमी हा सण मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी साजरा केला जाईल. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रांची पूजा करण्याची परंपरा शतकानुशतके जुनी आहे. हा सण भगवान रामाने रावणाचा आणि देवी दुर्गेने महिषासुराचा वध केल्याचे प्रतीक आहे. शस्त्रे हे आपले संरक्षण, सुरक्षा आणि अन्यायाचा नाश करण्याचे प्रमुख साधन आहेत. याच कारणामुळे विजयादशमीच्या या विशेष प्रसंगी शस्त्रांची पूजा केली जाते. या शुभ दिवशी आपल्या घरात शस्त्रांची पूजा केल्याने समृद्धी आणि सुरक्षिततेची भावना येते. चला तर दसऱ्याला शस्त्र पूजेचे महत्त्व आणि ती घरी कशी करावी हे जाणून घेऊया.



शस्त्र पूजेसाठी शुभ वेळ

दसऱ्याच्या दिवशी विजय मुहूर्त – २० ऑक्टोबर– दुपारी ०१:५९ ते दुपारी ०२:४५ पर्यंत

कालावधी: ४५ मिनिटे

अपराह्न पूजेची वेळ – दुपारी ०१:१४ ते संध्याकाळी ०३:३० पर्यंत

श्रवण नक्षत्र प्रारंभ – १९, ऑक्टोबर, संध्याकाळी ०३ वाजून ३८ मिनिटांपासून

श्रवण नक्षत्र समाप्ती – २० ऑक्टोबर, संध्याकाळी ०६ वाजून ०२ मिनिटांवर

प्रदोष काळ– २० ऑक्टोबर, संध्याकाळी ०५:४७ पासून

निशिता मुहूर्त– २० ऑक्टोबर, रात्री ११ वाजून ४१ मिनिटांपासून रात्री १२ वाजून ३१ मिनिटांपर्यंत

ज्याअर्थी दसऱ्याच्या दिवशी रावणाचे दहन प्रदोष मुहूर्तानुसार होते, म्हणूनच रावण दहन संध्याकाळी ५ वाजून ४७ मिनिटांनंतर करणे शुभ असेल. दसऱ्याच्या दिवशी सर्वप्रथम सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. तुमच्या घरातील देवघर किंवा कोणत्याही पवित्र ठिकाणी एक लाकडी चौरंग ठेवा आणि त्यावर लाल किंवा पिवळे कापड टाका. तुमची शस्त्रे, किंवा आजच्या काळातले चाकू, कात्री, तलवारी किंवा इतर संरक्षक उपकरणे पूर्णपणे स्वच्छ करून त्यावर ठेवा. यानंतर सर्व शस्त्रांना शुद्ध आणि पवित्र करण्यासाठी त्यांच्यावर गंगाजल शिंपडा. आता शस्त्रांवर हळद, कुकूं, अक्षता, ताजी फुले आणि दुर्वा अर्पण करा. यानंतर, गूळ आणि मिठाईचा प्रसाद अर्पण करा. दिवा व उदबत्ती लावून आरती करा.

## घटस्थापनेची रोपं हिरवीगार की खुंटलेली?

**नवरात्री** सुरू झाली की घराघरात घट बसवला जातो. घटस्थापनेला खूप महत्व आहे. पहिल्याच दिवशी लोक घट बसवून देवीची पूजा करतात. यावेळी मातीच्या टोपल्यात गहू, जव असे धान्य पेरले जाते. काही दिवसांनी त्याला छोटे छोटे हिरवे कोंब येतात. यालाच जवारे म्हणतात. हे फक्त रोप नाही, तर आपल्या परंपरेत याला खूप मोठा अर्थ आहे.

हे हिरवे रोप समृद्धीचे, नवीन जीवनाचे आणि चांगल्या बदलाचे लक्षण मानले जाते.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घट बसवताना एका मातीच्या भांड्यात गहू पेरतात. कोणी जव पेरतो, कोणी आपल्या गावाकडच्या पद्धतीनुसार दुसरे धान्य पेरतो. रोज त्यावर थोडे पाणी शिंपडले जाते. ३-४ दिवसातच त्याला हिरवी रोपे फुटायला



लागतात. काही ठिकाणी याला जवारे म्हणतात. नवरात्रीच्या नऊ दिवसात या रोपांची वाढ बघणे हा एक विधीच आहे. ही हिरवळ बघितली की मन प्रसन्न होते. हे नव्या जीवनाचे आणि निसर्गाच्या ताकदीचे प्रतीक आहे.

आपली संस्कृती ही शेतीशी जोडलेली आहे. पूर्वीपासून पीक चांगले आले की घरात धान्य भरपूर, म्हणजे समृद्धी आली असे समजायचे. त्यामुळेच घटातले धान्य चांगले वाढले तर चांगले पीक येणार, घरात भरभराट होणार असा समज आहे.हे रोप वाढण्यासाठी पाणी, हवा, ऊन सगळे बरोबर लागते. निसर्गाची साथ असेल तरच बीज अंकुरते. त्यामुळे हा विधी फक्त धर्माशी नाही तर निसर्गाच्या चक्राशी पण जोडलेला आहे.

नवरात्रीत लोक रोज त्या रोपांकडे बघतात. रोपे हिरवीगार आणि उंच वाढली तर लोक त्याला शुभ मानतात नऊ दिवस झाल्यावर दहाव्या दिवशी घटाचे विसर्जन करतात. तेव्हा प्रत्येक घरात वेगळी पद्धत असते. काही लोक ही रोपे देवीला वाहतात. काही लोक ती टोपीवर किंवा डोक्यावर ठेवतात आणि प्रसाद म्हणून घेतात. काही ठिकाणी ती रोपे शेतात नेऊन मातीत मिसळतात. गावागावात ही पद्धत वेगळी असते.

एकंदरीत घटातील जवारे ही फक्त पूजा नाही. यातून देवीची शक्ती, भक्ती आणि निसर्गाचा संदेश मिळतो. देवीची पूजा केल्याने मनाला बळ मिळते आणि या हिरव्या रोपांकडे बघून नवीन सुरुवातीची प्रेरणा मिळते. म्हणूनच या परंपरेकडे फक्त विधी म्हणून नाही तर आपल्या निसर्गाशी असलेल्या नात्याचे प्रतीक म्हणून बघितले पाहिजे.

## आज सूर्य कन्या राशीतून तूळ राशीत प्रवेश करणार

**ज्योतिषशास्त्रामध्ये** सूर्याच्या राशीबदलाला महत्त्वपूर्ण मानले जाते. ज्यावेळी सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, त्यावेळी त्याला संक्रांती म्हणतात. एका वर्षात एकूण १२ संक्रांती असतात. यापैकी एक तूळ संक्रांती आहे, जेव्हा सूर्य कन्या राशीतून तूळ राशीत प्रवेश करतो. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी सूर्यदेवाची पूजा करणे, स्नान करणे आणि गरजूंना दान करणे याला विशेष महत्त्व आहे.

तूळ संक्रांती शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी साजरी केली जाणार आहे. या दिवशी, सूर्यदेव सायंकाळी तूळ राशीत प्रवेश करणार आहे. तूळ संक्रांती कधी आहे, शुभ वेळ आणि धार्मिक कार्यांबद्दल जाणून घेऊया.

पंचांगानुसार, तूळ संक्रांती शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी आहे. या दिवशी सूर्य सायंकाळी ७:५७ वाजता तूळ राशीत प्रवेश करणार आहे. राशीबदलाच्या या प्रक्रियेला तूळ संक्रांती म्हणतात. हिंदू धर्मात, संक्रांती हा धार्मिक कार्यांसाठी एक विशेष दिवस मानला जातो. या निमित्ताने लोक पवित्र नद्यांमध्ये स्नान करतात आणि सूर्यदेवाला पाणी अर्पण करतात.



तुला संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर स्नान करणे आणि दान करणे शुभ मानले जाते. यावेळी शुभ मुहूर्त दुपारी १२:०६ ते सायंकाळी ५:५० पर्यंत असेल. याचा कालावधी अंदाजे ५ तास ४३ मिनिटे असेल.

हिंदू धर्मात संक्रांती दान आणि सत्कर्मांशी संबंधित आहे. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी पवित्र नदीत स्नान केल्याने आणि गरजूंना मदत केल्याने पुण्य मिळते. जे लोक नदी किंवा तीर्थक्षेत्राला भेट देऊ शकत नाहीत, ते पुण्यकाळ किंवा महापुण्यकाळात घरीसुद्धा विधी करू शकतात. या दिवशी सूर्यदेवाला पाणी अर्पण करण्याची परंपरा आहे. पूजेदरम्यान सूर्यदेवाचे स्मरण केले जाते आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली जाते. याव्यतिरिक्त, ऐपतीनुसार तांदूळ, गहू, डाळी, फळे, कपडे किंवा अन्नधान्याचे दान केले जाऊ शकते. दान करताना, दिखावा करण्याऐवजी गरजूंना मदत करण्याची भावना असणे महत्त्वाचे आहे.

तुला संक्रांतीच्या दिवशी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावे. त्यानंतर सूर्यदेवाला जल अर्पण करून सूर्यदेवाचे स्मरण करा आणि आपल्या कुटुंबाच्या सुख-समाधानासाठी प्रार्थना करा. शक्य असल्यास, या दिवशी गरजूंना भोजन द्या किंवा आपल्या क्षमतेनुसार दान करा. धार्मिक परंपरेनुसार सूर्यदेवाला जल अर्पण करण्यासाठी तांब्याच्या भांड्याचा वापर करण्याची शिफारस केली जाते. पूजेदरम्यान आपले मन शांत ठेवा आणि भक्तिभावाने प्रार्थना करा.

## नवरात्रीत १०० वर्षांनंतर गजकेसरी योग



**शारदीय** नवरात्रोत्सव यंदा ११ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू झाले आहे. १९ ऑक्टोबरला नवमी आणि २० ऑक्टोबरला विजयादशमी साजरी केली जाणार आहे. यंदाची नवरात्री धार्मिक उत्सवासोबतच ज्योतिषशास्त्रीय दृष्ट्याही विशेष मानली जात आहे. ज्योतिषीय गणनेनुसार, जवळपास १०० वर्षांनंतर नवरात्रीच्या काळात गुरु आणि चंद्राच्या विशेष स्थितीमुळे गजकेसरी योग तयार होणार असल्याचे सांगितले जात आहे. या योगाचा काही राशींवर सकारात्मक प्रभाव पडू शकतो. त्यामुळे नवरात्रीच्या काळात कोणत्या ७ राशींना याचा फायदा होऊ शकतो, याची चर्चा सुरू झाली आहे.

मेष राशीच्या व्यक्तींना कामाच्या ठिकाणी पुढे जाण्याच्या संधी मिळू शकतात. नोकरीत पदोन्नतीची शक्यता आहे. तसेच प्रेमसंबंधांमध्ये सुद्धा जवळीक वाढू शकते.

वृषभ राशीच्या व्यक्तींना अडकलेले पैसे परत मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आर्थिक बाबतीत दिलासा मिळू शकतो. वैवाहिक जीवनातही समजूतदारपणा आणि गोडवा वाढण्याचे संकेत आहेत. आहाराबाबत निष्काळजीपणा करू नका, असा सल्ला देण्यात आला आहे.

कर्क राशीसाठी हा योग विशेष मानला जात आहे. मान-सन्मान आणि प्रतिष्ठेत वाढ होऊ शकते. विवाहासाठी इच्छुक व्यक्तींना लग्नासंबंधी चांगली बातमी मिळण्याची शक्यता असल्याचे सांगितले जाते.

सिंह राशीच्या व्यक्तींना व्यवसायात फायदा होण्याची शक्यता आहे. व्यापाऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो. जोडीदारासोबत धार्मिक स्थळी प्रवास करण्याचा योगही आहे. मात्र, हवामानाशी संबंधित आरोग्याच्या समस्यांबाबत सावध राहण्याचा सल्ला दिला जातो.

तूळ राशीच्या व्यक्तींच्या कामाचे कार्यालयात कौतुक होऊ शकते. वरिष्ठांकडून प्रशंसा मिळण्यासोबतच करिअरमध्ये सकारात्मक बदल होण्याची शक्यता आहे. प्रेमजीवनातही काही सुखद बदल घडू शकतात.

मकर राशीच्या व्यक्तींसाठी जमीन किंवा घरासारख्या अचल संपत्तीशी संबंधित कामांमध्ये प्रगतीचे मार्ग खुले होऊ शकतात. जोडीदाराची साथ मिळेल. मात्र, सांधेदुखी किंवा शरीरातील वेदनांशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.

कुंभ राशीच्या व्यक्तींसमोर करिअरमध्ये नवीन आव्हाने येऊ शकतात. मात्र, या आव्हानांमधून पुढे जाण्याच्या संधीही निर्माण होऊ शकतात. कामासोबतच तुमची दैनंदिन दिनचर्या सुव्यवस्थित ठेवणे महत्त्वाचे ठरेल. नात्यात अधिक सुसंवाद साधण्यासाठी आपल्या जोडीदाराशी मोकळेपणाने संवाद साधण्याचा सल्ला दिला जातो.

## दसऱ्याला झाडू का खरेदी करावा?

**दसऱ्याला** खरेदी केलेला झाडू हा दिवाळीच्या स्वच्छतेसाठी वापरता येऊ शकतो. तसेच दसऱ्या दिवशी झाडू खरेदी करणे ही एक नवीन शुभ सुरुवात आहे.वास्तुशास्त्रानुसार, झाडू घरातील वास्तुदोष दूर करतो. त्यामुळे आर्थिक लाभ देखील होतो आणि



आपले भाग्य उजळते. दसऱ्याला घरात झाडू आणल्यानं जीवनातील अनेक अडचणी दूर होतात. करिअर, व्यवसाय आणि नातेसंबंधांमध्ये नवीन संधी निर्माण होतात. घरातून नकारात्मक्ता दूर होते, ज्यामुळे आनंद आणि शांती येते.दसऱ्यासाठी झाडू-उपाय - दसऱ्यादिवशी सकाळी स्नान करा, स्वच्छ कपडे घालून पूजा करा.त्यानंतर,बाजारातून गवत किंवा बांबूपासून बनवलेला झाडू आणा. अधिक शुभतेसाठी लाल कपड्यात गुंडाळा.एकादशीला त्याचा वापर सुरू करा. घराच्या वायव्य कोपऱ्यात ठेवा. यामुळे घरात सुख आणि समृद्धी येते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

## दसऱ्याला सोनं का खरेदी करतात?



**दसऱ्याच्या** दिवशी सोने खरेदी करण्यामागे धार्मिक, सांस्कृतिक आणि शुभ मानले जाणारे काही प्रमुख कारणे आहेत.

साडेतीन मुहूर्त: दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक संपूर्ण आणि अत्यंत शुभ मुहूर्त मानला जातो। या दिवशी कोणतेही शुभ काम किंवा नवीन खरेदी केल्यास ते यशदायी ठरते।लक्ष्मीचे प्रतीक: सोने हे संपत्ती, समृद्धी, ऐश्वर्या आणि माता लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते। दसऱ्याला सोने खरेदी केल्याने घरात वर्षभर सुख, शांती आणि धन-धान्य टिकून राहते अशी श्रद्धा आहे।

विजयाचा सण: दसरा हा वाईटावर चांगल्याच्या विजयाचा (विजयादशमी) दिवस आहे। या शुभ प्रसंगी नवीन व मौल्यवान वस्तू घरात आणणे शुभ मानले जाते।सुरक्षित गुंतवणूक: आर्थिक दृष्टीनेही दसऱ्याचा मुहूर्त गुंतवणुकीसाठी चांगला मानला जातो, ज्यामुळे भविष्यात संपत्तीत वाढ होते।

## आपट्याची पाने आणि वास्तुशास्त्र

वास्तुशास्त्र आणि परंपरेनुसार आपट्याचे झाड अतिशय शुभ, सकारात्मक ऊर्जा देणारे आणि महादोषांचे निवारण करणारा वृक्ष मानले जाते.

धार्मिक आणि वास्तूचे महत्त्व: सकारात्मक ऊर्जा व समृद्धी:दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने'सोने'म्हणून वाटण्याची प्रथा आहे,ज्यामुळे घरातसुख,समृद्धी आणि परस्पर प्रेम वाढते.दोष निवारण: वास्तूशास्त्र आणि प्राचीन मान्यतेनुसार आपट्याचा वृक्ष घराजवळील किंवा परिसरातील नकारात्मक ऊर्जा,भीती आणि विविध दोष दूर करण्यास मदत करतो.आराध्य वृक्ष: हा वृक्ष शततारका नक्षत्र आणि कुंभ राशीचा आराध्यवृक्ष मानला जातो.

## साप्ताहिक राशीभविष्य

### १७ ऑक्टोबर २०२६ ते २३ ऑक्टोबर २०२६

**प्रतिष्ठा व प्रसिद्धी मिळेल**

**मेष** : प्रगतीत वाढ होण्यासाठी प्रयत्नशील राहाल; परंतु जास्त कष्टाची आवश्यकता भासेल. निरनिराळ्या सोयी-सुविधा उपलब्ध होतील.नातेवाईक,आप्तेष्ट यांच्याशी संबंध सुधारतील. मित्र मंडळ यांच्या वर्तुळात प्रिय व्हाल.जवळच्या लोकांचे सहकार्य प्राप्त होईल. कुटुंबातील व्यक्तींच्या संबंधांकडे लक्ष देण्याची गरज राहील. आपल्या वर्तनाने किंवा बोलण्याने इतर व्यक्ती दुखावणार नाहीत अथवा दुरावणार नाहीत याची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरेल. जवळचे तसेच लांबचे प्रवास यशस्वी होतील.

**नवनवीन संधींचा लाभ**

**वृषभ** : दीर्घकालीन रखडलेली अथवा प्रलंबित असलेली कामे मार्गी लागून पूर्णत्वाकडे प्रवास करतील. विशेषतः जमीन-जुमला, स्थावर मिळकत, वडिलोपार्जित संपत्ती याविषयी असलेले प्रश्न मार्गी लागतील. धनलाभाचे योग. राहत्या घराविषयीचा प्रश्न सुटेल. बरेच दिवस उराशी बाळगलेले स्वतःच्या मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण होईल. मात्र त्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.खेळाडू व कलाकार यांना नवीन लाभ मिळेल. त्याचप्रमाणे उत्पन्नात वाढ होईल. प्रसिद्धी मिळेल. व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहून परदेशी संबंध येऊ शकतो.

**धाडसी निर्णय घ्याल**

**मिथुन** : नवीन निर्णय घेण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण होऊन आपण धाडसी निर्णय घ्याल. व्यवसायात किंवा घरगुती कामात सुद्धा प्रसार माध्यमांचा चांगला उपयोग होईल. नव्या ओळखी होऊन नवीन व्यावसायिक अनुबंध जुळतील. व्यवसायात प्रगती करण्याच्या संधी मिळतील. उत्पन्न वाढेल. आर्थिक परिस्थिती सुधारेल. सामाजिक कार्यात रस घ्यावासा वाटेल. वाढविण्याकरीता खर्च कराल. व्यावसायिक व व्यक्तिगत आयुष्यात आपल्याला संबंधितांचे उत्तम सहकार्य लाभेल. पूर्वी अनुभवास आलेली आर्थिक कोंडी फुटेल.

**अनपेक्षित फायदे**

**कर्क** : नोकरी, व्यवसाय धंदा यामधून अनपेक्षित फायदे मिळाल्यामुळे आश्चर्यचकित होण्याची वेळ येईल. समाजातील प्रतिष्ठित अथवा मोठ्या व्यक्तींचे आपल्याला सहकार्य लाभून त्यांच्या सहवासात राहता येईल. व्यावसायिक प्रगती होईल. समाजातील आपल्या प्रतिमेबाबत जागृत राहाल. त्यासाठी वेळ, पैसा खर्च करण्याची प्रवृत्ती बळावेल. काही वेळेस घरातील कामांसाठी आपला जास्तीत जास्त वेळ खर्च होऊ शकतो. घरासाठी काही नवीन वस्तू विकत घ्याल. घराच्या नूतनीकरणाची इच्छा होईल.

**ताणतणावात मुक्तता**

**सिंह** : आपली बरीचशी कामे मार्गस्थ होतील.नोकरीसाठी अथवा अन्य कारणांसाठी दिलेल्या मुलाखती यशस्वी ठरून कामे होतील. बरेच दिवस रेंगाळलेली कामे मार्गी लावू शकाल. व्यावसायिक गाठीभेटी होतील. त्यातूनच व्यवसायासंबंधी भविष्यातील योजना तयार होतील. त्यामध्ये व्यस्त राहाल. नवीन मित्र मैत्रिणी जोडण्याची इच्छा होईल. व्यवसायानिमित्त अथवा धार्मिक कौटुंबिक कारणाने जवळचे तसेच दूरचे प्रवास घडतील.

**भाग्यसंकेत मिळतील**

**कन्या** : कामात सुसहाय्यता येणार आहे.सकारात्मकतेमध्ये वृद्धी होऊन अनुकूल परिणाम मिळतील.आपले बुद्धिचातुर्य व आत्मविश्वास, अंदाज यामध्ये द्वंद राहील.शांततेने मार्ग निघतील. आपण घेतलेले निर्णय योग्य ठरतील. त्यामुळे भाग्याचे संकेतच मिळतील. वैवाहिक जीवनात आनंद मिळेल. पती अथवा पत्नीचा भाग्योदय होऊन उत्कर्ष होईल.व्यवसाय धंद्यात उत्कर्ष अथवा प्रगती करु शकाल.त्यांच्या विवाहात येणाऱ्या अडचणी दूर होतील.

**चिंता मिटतील**

**तूळ** : प्रिय व्यक्तीची चिंता संपुष्टात येईल. कुटुंब परिवारात शुभवार्ता मिळतील. तरुण-तरुणींच्या समस्या संपुष्टात येतील. नोकरीविषयक कामे होतील. व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहील. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सदरचा कालावधी अनुकूल आहे. भौतिक लाभात वाढ होईल. भागीदारीच्या व्यवसायात विशेष फायदा संभवतो. धार्मिक कार्यात रस घेतल्याने आपल्याला समाधान लाभेल. नोकरीतील परिस्थिती सर्वसामान्य राहून इतरांचे सहकार्य मिळेल. वैवाहिक सुख मिळेल. कौटुंबिक सुखाची प्राप्ती होईल.

**वाद-विवाद नको**

**वृश्चिक** : व्यवसाय धंद्यामधील उधारी वसूल होईल. व्यवसाय धंद्यामध्ये कामगारांचे प्रश्न अचानक समोर येऊ शकतात. सरकारी स्वरूपाचे काम मार्गी लागू शकेल.त्यामध्ये आपल्याला इतरांची मदत मिळू शकते;नोकरीमधील तसेच व्यवसायातील अपेक्षित सहकार्य मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. व्यवसायातील आर्थिक गरज पूर्ण होऊ शकते.विद्यार्थ्यांनी आपल्या उज्वल भविष्यासाठी इतरत्र वेळ न घालवता अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे.काही वेळेस अचानक धनलाभ संभवतो.

**नवीन उत्साह-उमेद वाढेल**

**धनु** : दीर्घकालीन रखडलेली जमीन-जुमला,स्थावर मिळकत याबाबतची कामे गतिमान होऊन मार्गी लागतील.कुटुंबातील तरुण-तरुणींचे प्रश्न अथवा समस्या संपुष्टात येतील.नोकरीविषयक कामे होतील.कलाकार,खेळाडू यांना नवीन संधी मिळतील.आपले कर्तृत्व सिद्ध करण्याच्या संधी चालून येतील;परंतु या संधीचे सोने करणे आपल्याच हातात आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.संयम बाळगा.

**शुभ घटनांचे पर्व**

**मकर** : आपल्या जीवनात काही सकारात्मक बदल झाल्यामुळे काही सुखद घटना घडतील. व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहून नफ्याच्या प्रमाणात वाढ झालेली अनुभवता येईल. नोकरीमध्ये अपेक्षित घटना घडून पदोन्नती, वेतन वृद्धी यांसारख्या घटना घडतील. एखादी महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागेल. सरकारी स्वरूपाच्या नोकरीमध्ये अतिरिक्त कार्यभार सोपवला जाण्याची शक्यता आहे. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल परंतु आपण आपल्या अधिकार कक्षा ओळखून कार्य पूर्ण करणे हिताचे ठरेल. तसेच लहान मोठ्या प्रलोभने यांच्यापासून दूर राहावे. एखाद्या महत्त्वाच्या समारंभात मानाचे स्थान मिळेल.

**दिलासा मिळेल**

**कुंभ** : आजपर्यंत एखादे महत्त्वाचे काम जे रखडलेले होते किंवा आपण त्यांना कामाची पूर्ण होण्याची वाट बघत होता अशा स्वरूपाचे कार्य अचानक पूर्ण झाल्यामुळे आश्चर्य वाटेल. आर्थिक फायदा मिळू शकतो. काहींना वास्तुयोग. आपल्या स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होऊ शकते; प्रयत्न सफल होतील. कुटुंब परिवारात आपल्या जीवन साथीचे सहकार्य आपल्याला मिळत राहील. धनलाभाचे योग. तसेच व्यवसाय- धंद्यातील स्पर्धकांवर विशेष स्वरूपाची मात करू शकाल. नवीन संकल्पना नवीन तंत्रज्ञान यांचा वापर करून व्यवसायात बदल कराल. विद्यार्थ्यांना अनुकूल कालावधी आहे. परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकते.

**उत्तम पर्याय मिळतील**

**मीन** : अनेकानेक नवीन संधी मिळतील.आपले कर्तृत्व सिद्ध करता येईल. परदेशगमन होऊ शकते.भाग्योदय होईल. मानसन्मान प्राप्त होऊन अर्थार्जन वाढेल.कामाच्या स्वरूपात बदल होऊन स्थान बदल सुद्धा होऊ शकतो. आपले कार्यक्षेत्र रुंदावेल अधिकारांमध्ये वृद्धि होईल.त्याचा योग्य तो वापर करणे व आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करणे हिताचे ठरेल. कुटुंब परिवारातील विवाहयोग्य काहींचे परिचयोत्तर विवाह ठरण्याची शक्यता. घरात मंगल कार्य करू शकते.नातेवाईक आप्तेष्ट यांच्या गाठीभेटी होतील.सहकुटुंब,सहपरिवार लहान-मोठ्या प्रवासाचे योग.

# वेदगंगा कोरडी ; निपाणीवर ऑक्टोबरमध्येच जलसंकट

## जवाहर तलावातील पाण्यावर भिस्त : पाणी कपातीची शक्यता

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

**चालू वर्षात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाल्यामुळे निपाणी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या वेदगंगा नदीचे पात्र ऐन ऑक्टोबर महिन्यातच पूर्णपणे कोरडे पडले आहे.नदीत थेंबभरही पाणी शिल्लक नसल्याने, यमगर्णी येथील पालिकेच्या दोन्ही मुख्य जॅकवेलमधील पाणी उपसा करणाऱ्या मोटरी पूर्णपणे बंद पडल्या आहेत. यामुळे निपाणी शहरावर भीषण पाणी टंचाईचे संकट ओढवले असून, नगरपालिकेने सर्व शहरवासीयांना पाणी जपून व काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले आहे.**

सामान्यतः जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात उद्‌भवणारी परिस्थिती यंदा तब्बल तीन–चार महिने आधीच म्हणजे ऑक्टोबरमध्येच निर्माण झाल्याने



यमगर्णी जवळ वेदगंगा नदीचे पात्र कोरडे पडले आहे.

प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. वेदगंगा नदी कोरडी पडल्यामुळे निपाणी शहराची संपूर्ण भिस्त केवळ जवाहर तलावातील उपलब्ध जलसाठ्यावरच अवलंबून असणार आहे. मात्र, तलावातील पाणीपातळी केवळ ४३ फूटांवर मर्यादित असल्याने शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होण्याची आणि पाणी कपातीला सामोरे जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.सध्या शहराला ४ ते ५ दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा केला जात आहे.

ऐन सणासुदीच्या दिवसांतच वेदगंगा कोरडी पडल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. भविष्यातील तीव्र टंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा अपव्यय पूर्णपणे थांबवावा, असे आवाहन पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

**काळम्मावाडीच्या पाण्याची प्रतिक्षा**

सध्या नदीचे पात्र कोरडे पडल्याने आता शेतकऱ्यांना काळम्मावाडीतून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची प्रतिक्षा लागून राहीली आहे.मात्र हे पाणी कधी सोडले जाईल, हे सांगता येत नाही.सध्याची स्थिती पाहता पाटबंधारे खात्याकडून उपसाबंदी लागू होण्याची शक्यता आहें.

# शिप्पूरला घरासह जनावरांचा गोठा आगीत भस्मसात

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

**शिप्पूर (ता.हुक्केरी) येथील चंदनगिरी गल्लीत शुक्रवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे घरासह बाजूला असणाऱ्या जनावरांच्या गोठ्यास भीषण आग लागली. या आगीमध्ये सागर बाबुराव ठक यांच्या घराचे व बाबू कृष्णात मगदूम यांच्या जनावरांच्या गोठ्याचे मिळून सुमारे ६ लाख रुपयांचे नुकसान झाले.**

चंदनगिरी गल्लीत सागर ठक यांचे घर असून लगतच मगदूम यांचा जनावरांचा गोठा आहे.दुपारी घरात कोणीही नसताना शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले.घरांतून आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट बाहेर पडू लागले. घरात असलेले अन्नधान्य, कपडे, फर्निचर आणि महत्त्वाचे दस्तऐवज या आगीत पूर्णपणे जळून खाक झाले. गोठ्यातील लाकडी साहित्य पूर्णपणे जळाले आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी पाण्याचा मारा



आग विझवताना अग्निशामक दलाचे जवान.

करून आग विझवण्याचा प्रयत्न केला.मात्र वाढत्या उन्हामुळे आगीची तीव्रता वाढल्यामुळे संकेश्वर अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले.बंब घटनास्थळी दाखल झाल्यानंतर जवान आणि ग्रामस्थांनी मिळून आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले.त्यामुळे शेजारील इतर घरांना आगीची झळ बसण्यापासून रोखता आले.

# डोणोलीत घरफोडी

## सव्वापाच लाखांचा ऐवज लंपास

सरूड,ता.१६(प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील डोणोली येथे बंद घराच्या दरवाजाचे कुलूप उघडून घरात प्रवेश करत चोरट्याने रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा एकूण ५ लाख २० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शाहूवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.**

दत्तात्रय सर्जेराव जानकर हे १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा ते दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान शेतात शेड उतरविण्यासाठी व आईच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी घराबाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाला असलेल्या कडीच्या खाली ठेवलेली चावी घेऊन कुलूप उघडले आणि घरात प्रवेश केला. तिजोरीच्या लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरट्याने लंपास केले. दोन लाख रुपये रोख, सुमारे एक लाख २० हजार रुपये किमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची गजराची चैन, प्रत्येकी ८० हजार रुपये किमतीची सोन्याची रास्सी चैन व सोन्याचे–काळ्या मण्यांचे मंगळसूत्र तसेच ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे बोरमाळ यांचा समावेश आहे.



# पालकांचे स्वप्न पूर्ण करणे विद्यार्थ्यांचे कर्तव्य : विनायक बन्ने

इचलकरंजी,ता.१६

**यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी शिस्तीचे पालन केले पाहिजे. कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी एक योग्य वेळापत्रक तयार असावे, पालकांचे स्वप्न पूर्ण करणे हे विद्यार्थ्यांचे आद्य कर्तव्य असून विद्यार्थ्यांची मनोदशा समजून त्यांना पालकांनी योग्य मार्गदर्शन करावे तरच गुणवत्तापूर्ण नवीन पिढी घडेल, असे सामाजिक कार्यकर्ते विनायक बन्ने यांनी सांगितले.**

डीकेटीई सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम हायस्कूल याठिकाणी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ झाला. यावेळी मिलन बन्ने व संदीप केर्ले प्रमुख पाहुणे उपस्थित होते. प्रमिला चावरे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. उत्तम कुंभार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी मुख्याध्यापिका कासार यांच्यासह शिक्षक,पालक,विद्यार्थी उपस्थित होते. आभार महादेव खेबुडे यांनी मानले.



# श्री अंबाबाई भक्त मंडळातर्फे भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी)–

**श्री अंबाबाई भक्त मंडळ व श्री गजानन महाराज (शेगाव) भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्री निमित्त भाविकांसाठी अंबाबाई मंदिराच्या आवारात महाप्रसादाचे वाटप अॅड.धनंजय पठाडे यांच्या हस्ते झाले.**

अंबाबाई भक्त मंडळाचे अध्यक्ष संजय साळोखे व गजानन महाराज शेगाव भक्त मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब इंगवले, कृष्णात कामटे, संगीता साळोखे, पद्मा बोंद्रे, गीता भोईटे, रंजना साळोखे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. महाप्रसादाचा लाभ अनेक भक्तांनी घेतला.

# शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून श्री मूर्ती पुन्हा विसर्जित

इचलकरंजी, ता. १६ –

**येथील पंचगंगा नदीतील पाण्याची पातळी घटल्याने गणेशोत्सवातील विसर्जित मोठ्या मुर्तीचे सांगाडे आणि अर्धवट विरघळलेल्या मूर्ती नदीपात्राबाहेर काढण्यासाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेने पुढाकार घेतला आहे. महापालिकेच्या सहकार्यातून क्रेन आणि यांत्रिक बोटीच्या सहाय्याने शक्य असलेल्या मुर्ती पुन्हा विसर्जित केल्या जात असून मोठ्या मूर्ती नदीकाठावर एकत्र केल्या जात आहेत. दोन दिवसात या मोहिमेत ५० मूर्त्या पुन्हा विसर्जित केल्या असून ७५ मुर्त्या नदीपात्राबाहेर काढल्या आहेत.**

इचलकरंजीत परंपरेनुसार गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.पण,श्रींच्या विसर्जनानंतर आता पंचगंगा नदीतील पाणी पातळी घटली आहे. त्यामुळे मंडळांनी ईर्षेतून प्रतिष्ठापना केलेल्या उंच आणि भव्य मुर्तीचे सांगाडे आणि अर्धवट विरघळलेल्या मुर्तीचा ढिगारा पात्रात दिसत आहे. नदीवरील जुन्या आणि नव्या या दोन्ही पुलांच्या परिसरात तसेच घाटाजवळही असेच चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे आपल्या श्रद्धास्थानांची ही अवस्था टाळण्यासाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेने पुढाकार घेतला आहे. गुरुवारपासून संघटनेने क्रेन आणि यांत्रिक बोटीच्या सहाय्याने या मूर्तीपैकी शक्य असलेल्या मूर्ती पुन्हा विसर्जित करण्याबरोबरच मोठे सांगाडे नदीकाठावर एकत्र करण्याची मोहिम सुरु केली आहे. स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, संजय खोत यांच्या सहकार्याने या मोहिमेत संघटनेचे कार्यवाह प्रसाद जाधव, मंगेश मस्कर, विनायक सातपुते, अभी शेळके, स्वप्निल लोहार, रोहित म्हेतर, निशांत साळी यांच्यासह ५० हुन अधिक धारकरी सहभागी झाले आहेत.

# कोल्हापुरात वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी) –

**भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वृत्तपत्र विक्रेता दिन आणि वाचक प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भाऊसिंगजी रोड येथील वृत्तपत्र विक्रेता डेपोमध्ये डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष किरण व्हनगुत्ते आणि कोल्हापूर महानगर वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष रवी लाड, संदीप गिरगोसावी उपस्थित होते.

# ग्रामपंचायती लोकप्रतिनिधींच्याच ताब्यात द्या

## अखिल भारतीय सरपंच परिषदेची मागणी

गांधीनगर,ता.१६(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्रातील १६ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपली असून, निवडणुका रखडल्याने ग्रामीण भागातील विकासकामांवर परिणाम होत आहे. राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर तातडीने निवडणुका घ्याव्यात. तोपर्यंत विद्यमान सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनाच कारभार करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी पंचायत राज विकास मंच संचलित अखिल भारतीय सरपंच परिषदेचे संस्थापक अध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.**

ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विस्तार अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्याने अनेक ठिकाणी प्रशासकीय गोंधळ निर्माण झाला आहे. काही अधिकाऱ्यांकडे पाच ते वीस ग्रामपंचायतींचा कारभार सोपविण्यात आल्याने पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती आणि विकासकामांवर परिणाम होत आहे.दुष्काळाच्या काळात पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा, पीकविमा, शासकीय मदत आणि रोजगार हमीच्या कामांचे नियोजन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत. त्यामुळे राज्य शासन व निवडणूक आयोगाने समन्वय साधून निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी पाटील यांनी केली. यावेळी प्रदीप माने–पाटील, जितेंद्र यशवंत, ओंकार शिंत्रे, सुहास इंगळे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# निरोगी आरोग्यासाठी खेळ महत्वाचा:शहापूरे

## महापालिका जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी ता.१६ –

**खेळामुळे चिकाटी, जिद्द तयार होऊन, शरीर–मन तंदुरूस्त राहून नेतृत्व गुण तयार होते, नेहमी खेळत राहिल्यास मोबाईल मधूनही बाहेर पडता येते. बॅडमिंटन, क्रिकेट या खेळाबरोबर कबड्डी व खो–खो या सारखे देशी खेळसुध्दा खेळत रहावे, असे विचार नरेंद्र सहकारी हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष आण्णासाहेब शहापुरे यांनी व्यक्त केले. इचलकरंजी (म.न.पा.) जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा नरेंद्र हौसिंग बॅडमिंटन कोर्टात घेण्यात आल्या. १४ वर्षे, १७ वर्षे व १९ वर्षे या तीन गटातील जवळपास १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.**

स्पर्धेचे उद्‌घाटन नरेंद्र हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष आण्णासाहेब



बॅडमिंटन स्पर्धेप्रसंगी क्रीडा अधिकारी सुर्यकांत शेटे यांचा सत्कार करताना आण्णासाहेब शहापुरे शेजारी संतोष सावंत व मान्यवर.

शहापुरे यांच्या हस्ते इचलकरंजी महानगरपालिका क्रिडाअधिकारी सुर्यकांत शेटे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.इचलकरंजी महानगरपालिका बॅडमिंटन स्पर्धेचे प्रमुख संतोष सावंत व सागर पाटील यांनी स्पर्धेचे नेटके नियोजन केले होते.

आभार सहाय्यक क्रिडा अधिकारी सचिन खोंद्रे यांनी मानले. स्पर्धेसाठी क्रिडा शिक्षक अनिल थोरवत, कृष्णा अडकिल्ला, राजू रूग्गे, दिपक शिंत्रे यांच्यासह बॅडमिंटन स्पर्धक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# मोरेवाडीत स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र कार्यान्वित

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी) –

**प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मोरेवाडी येथे स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये आधुनिक स्वयंचलित यंत्रणेद्वारे वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यात येणार आहे.**

जिल्ह्यातील संबंधित वाहनमालकांना या सुविधेचा लाभ घेता येणार असून वाहन तपासणीसाठी ऑनलाइन अपॉइंटमेंट आरक्षित करावयाचे आहे. या केंद्रामध्ये वाहनांची तपासणी स्वयंचलित यंत्रणेद्वारे करण्यात येणार असून, केंद्राचे कामकाज टप्प्याटप्प्याने पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनमालकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहून तपासणी प्रक्रियेस सहकार्य करावयाचे आहे,असे प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी सांगितले.

## अपघातात कलाकाराचा मृत्यू

चिक्कोडी,ता.१६(प्रतिनिधी)–

**एकसंबा–चिक्कोडी मार्गावरील नणदीवाडीजवळ ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या धडकेत एकसंबा येथील रंगभूमी कलाकार, एसटीचे निवृत्त वाहक गणेश शंकर मोपगार (वय ६३) यांचा मृत्यू झाला.**



गणेश मोपगार हे कामानिमित्त चिक्कोडी येथे जात असताना नणदीवाडी गावातील टाइल्स दुकानाजवळ त्यांच्या दुचाकीला ट्रकची धडक बसली. अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी असा परिवार आहे.


## जाहीर नोटीस

आमचे अशिल इंडियन ओव्हरसीस बँक शाखा इचलकरंजी जि. कोल्हापूर यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखवलेल्या कागदपत्रावरून त्यांचेवतीने व त्यांचेकरीता जाहीर नोटीस देणेत येते की,

आमचे अशिलांनी कर्जदार नभकुमार भुदेव प्रामाणिक वगैरे यांचे मालकीची घर नं.१४/ १९७, तांबे माळ, चौगुले हॉस्पिटल जवळ, इचलकरंजी येथीलच्या मिळकतीचा मा.मुख्य न्यायदंडाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील फौ.कि. अर्ज नं.५३५/ २०२६ चे कामी झालेल्या आदेशाप्रमाणे ताबा घेतला आहे. सदरची मिळकत सिल करून आमचे अशिलांचे ताब्यात घेतली आहे. सदरची मिळकत आमचे अशिलांनी लिलावाने विक्री व हस्तांतरीत केलेली आहे.

सबब या नोटीसीने कळविणेत येते की, सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत वर मिळकतीमध्ये असलेले चल वस्तु कर्जदार नभकुमार भुदेव प्रामाणिक व रूम्पा प्रामाणिक यांनी आमचे अशिलांशी रितसर खात्री करून घेवून स्वखर्चाने घेवून जावे. मुदतीत मिळकतीत असलेले चल वस्तु न घेतलेस त्याप्रसंगी होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. तसेच मुदतीनंतर आमचे अशिल मिळकतीत असलेल्या चल वस्तुची विल्हेवाट करतील.मुदतीनंतर कर्जदार नभकुमार भुदेव प्रामाणिक व रूम्पा प्रामाणिक यांची हरकत अगर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.म्हणून दिली नोटीस सही.

ता.१६.१०.२०२६

**अॅड.पुरूषोत्तम एन. शर्मा**

**रा.१२/१८५, गाळा नं. ५, बेसमेंट, हवामहल बंगलो रोड, वारणा बँकेजवळ,इचलकरंजी मो.नं.७२७६६८६१९७.**


# प्रात्यक्षिके व सुपरकेन नर्सरीसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मागविले

कोल्हापूर,ता.१६ (प्रतिनिधी) –

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान कार्यक्रमांतर्गत ऊस पिकातील प्रात्यक्षिके आणि सुपरकेन नर्सरी या घटकांसाठी पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांकडून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मागविण्यात येत आहेत.**

ऊस हे जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पीक असून, जिल्ह्यात ऊस लागवडीसाठी अनुकूल हवामान उपलब्ध आहे. तथापि, काही तालुक्यांतील व गावांतील ऊस उत्पादकता कमी असल्याने आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करून उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादकतेत वाढ करणे आवश्यक आहे.

या उद्देशाने ऊस पिकात एक डोळा पद्धतीने लागवड व आंतरपीक प्रात्यक्षिके तसेच पाचट व खोडवा व्यवस्थापन प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहेत.

पात्र शेतकरी गट व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर लवकरात लवकर अर्ज करावयाचे आहेत,असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे यांनी कळविले आहे.

## मिरज न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन

मिरज,ता. १६ (प्रतिनिधी) –

**समान कामासाठी समान वेतन मिळावे, या मागणीसाठी मिरज न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.**

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावे, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असून, वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित निर्णय झाला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. जिल्हा व तालुका न्यायालयांचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालविण्यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांची महत्त्वाची भूमिका असते.कामाचा व्याप आणि जबाबदाऱ्या मोठ्या असतानाही वेतनात तफावत असल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.


## जाहीर नोटीस

**मौजे कबनूर** येथील १) सि.स नंबर ८२८ पैकी **क्षेत्र ४५.१६ चौ.मी,** २) सि.स नंबर **८२९ पैकी क्षेत्र ४९.५४ चौ.मी,** ३) सि.स नंबर **८३० पैकी क्षेत्र १९४.७ चौ. मी,** ४) सि.स नंबर **८३३ पैकी क्षेत्र ४२.५ चौ.मी, ची मिळकत.** यासी एकत्रीत चतुः सिमा–पुर्वेस–१५ फुट रस्ता, पश्चिमेस–श्री.जाधव यांची मिळकत,दक्षिणेस–श्री. गायकवाड यांची मिळकत, उत्तरेस श्री. राऊत यांची मिळकत, सदरची मिळकत ही **भारती आनंदा कुंभार** रा. कबनूर यांच्या मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे **तोंडी करारपत्र** आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.१६/१०/२०२६

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**

**मो.नं. ९४२०७७६४८६**


# निपाणीत पान शॉप, वाईन्स शॉपमध्ये चोरी

निपाणी,ता.१६( प्रतिनिधी)–

**निपाणी मेडिकलसमोरील ओंकार पान शॉप आणि मुरगूड रोडवरील भुयारी मार्गाजवळील विशाल वाईन्स येथे गुरुवारी मध्यरात्री एकच्या सुमारास चोरी झाली. दोन्ही ठिकाणांहून रोख रक्कम लंपास करण्यात आली.**

दोन दिवसांपूर्वीच कित्तूर राणी चन्नम्मा सर्कल परिसरातील विलास माळी यांच्या सराफ दुकानात चोरी झाली होती. या घटनेत चार चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले होते. त्यानंतर पुन्हा दोन ठिकाणी चोरी झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.घटनेची माहिती मिळताच उपनिरीक्षक गंगापा पुजेरी यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.




आर्कि. किशोर सोनटक्के

## हार्दिक अभिनंदन!

आमचे परममित्र व सहकारी आर्कि. किशोर दयानंद सोनटक्के यांना ''उत्कृष्ठ आर्किटेक्ट पुरस्कार २०२६'' मिळालेबद्दल हार्दिक अभिनंदन!

**अनिल बापू नर्मदे * राजलक्ष्मी कन्स्ट्रक्शन, तारदाळ**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन– जिल्हा कोल्हापूर तहसील हातकणंगले मौजे तारदाळ येथील बिगरशेती मिळकत रि.स.नं. ५१७ मधील प्लॉट नं.४ चे क्षेत्र २२१.०८ चौ.मी. व प्लॉट नं.५ चे क्षेत्र २२१.०८ चौ.मी.असे एकूण क्षेत्र ४४२.१६ चौ.मी.ची मिळकत असे. यासी एकत्रित चतु:सिमा– पूर्वेस –रि.स.नं.५१४ पैकी श्री.चौगुले यांची मिळकत, पश्चिमेस–प्लॉट नं. ३ ची श्री.शहाजी कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस– ४.५ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस– श्री. इसक शेख,श्री.नामदेव कांबळे, श्री. अरुण मस्के व श्री. गायकवाड यांची मिळकत. याप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही बाळासाहेब विश्वासराव जाधव यांचे मालकीची असून सदर मिळकतीवर डॉ. आण्णासाहेब चौगुले अर्बन को. ऑप बँक लि.पेठ वडगाव यांचा जप्ती आदेश नोंद असून त्यांनी मिळकत आमचे अशिलांना विक्री करणेचे ठरले आहे. सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा काहीही हक्क, हित संबंध, दावा, तारण इ. वगैरे असलेस ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीत कोणाकडून कसलीही हरकत न आलेस आमचे अशिल ठरले कराराप्रमाणे सदर मिळकत खरेदी घेत आहेत. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. म्हणून प्रसिध्द केली जाहीर नोटीस. सही.

दि.१६/१०/२०२६

**अॅड.श्रीकांत चं.सुतार**

**९/५५, सांगली रोड, साळुंखे मळा, इचलकरंजी–४१६११५**

**मो. ७३८५७३७१७९**



## जाहीर नोटीस

**मौजे कबनूर,** ता. हातकणंगले येथील **क.ग.नं. ६९९** यापैकी बिगरशेती क्षेत्र हे. ०–२० आर ची खुली जागा मिळकत सर्व. यांसी चतु:सिमा **पुर्वेस**–चव्हाण यांची मिळकत, **पश्चिमेस** – जमादार यांची मिळकत, **दक्षिणेस**– २० फुट रस्ता, **उत्तरेस**– भोसले यांनी प्लॉट केलेली मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील बिगरशेती खुली जागा मिळकत सर्व ही **बापूसो महादेव पाटील रा. कबनूर** यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिल यांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवून सदर ठरले व्यवहारापोटी संचकार पावती करुन देवून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा पाटील यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क, अधिकार, वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटून खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे अशिल वरील मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

दि.१६/१०/२०२६

**अॅड.बाबासो एम.पाटील**

**१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी,इचलकरंजी.**

**मो.नं. ९२२६८८७००१**



शारदीय नवरात्रौत्सवाच्या सहाव्या माळेला शुक्रवारी करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) देवीची स्कदमाता रुपातील अलंकार पूजा बांधण्यात आली. नवदुर्गापैकी ही पाचवी दुर्गा आहे. ही पूजा अजित ठाणेकर, ओंकार कुलकर्णी, प्रसाद लाटकर, श्रीनिवास जोशी यांनी बांधली.

# मालिका कोण जिंकणार?




बंगळुरू,ता.१६–

**भारत – वेस्ट इंडिज यांच्यातील पाचवा आणि शेवटचा टी–२० सामना शनिवारी १७ ऑक्टोबर रोजी बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. चौथ्या सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा २४ धावांनी पराभव केला. त्यामुळे पाच सामन्यांची ही मालिका आता २–२ अशी बरोबरीत आली आहे.**

## भुवनेश्वर कुमारला संधी; भारत – वेस्ट इंडिज आज शेवटचा टी २० सामना

अर्शदीप सिंगच्या खांद्याला दुखापत झाल्यामुळे वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारचा संघात समावेश करण्यात आला आहे.३६ वर्षीय भुवनेश्वरची २२ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंड दौऱ्यासाठी टी–२० संघात निवड झाली होती. मात्र, अर्शदीपच्या दुखापतीमुळे तो संघात परतला आहे. भुवनेश्वरने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०२२ मध्ये खेळला होता.अर्शदीपला हैदराबादमध्ये खेळल्या गेलेल्या चौथ्या टी–२० सामन्यादरम्यान खांद्याला दुखापत झाली होती.भुवनेश्वर कुमारने आपला शेवटचा टी–२० आंतरराष्ट्रीय सामना २२ नोव्हेंबर २०२२ रोजी न्यूझीलंडविरुद्ध नेपियर येथे खेळला होता. त्यानंतर तो टीम इंडियातून बाहेर आहे.अंतिम सामना जिंकणारा संघ मालिका आपल्या नावावर करेल. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा सामना महत्त्वाचा असणार आहे.अंतिम सामना बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. त्यापूर्वी अर्धा तास आधी म्हणजेच ६.३० वाजता नाणेफेक होईल.

**भारत टी–२० संघ–** श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, ईशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), तिलक वर्मा (उपकर्णधार), शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, नितीश कुमार रेड्डी, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, मयंक यादव आणि नमन धीर.

**वेस्ट इंडिज टी–२० संघ –** शाय होप (कर्णधार आणि यष्टीरक्षक), ज्वेल अँड्र्यू, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्ड, शिमरॉन हेटमायर, अकेल होसेन, शामार जोसेफ, गुडाकेश मोती, कीमो पॉल, कामिल पूरन, रोवमन पॉवेल, शेरफेन रदरफोर्ड, क्वेंटिन सॅम्पसन, रोमॅरियो शेफर्ड आणि शमर स्प्रिंगर.



## तन्वी शर्मा उपांत्यपूर्व फेरीत

ओडेन्स,ता.१६ –

**भारताची १७ वर्षीय बॅडमिंटनपटू तन्वी शर्मा हिने डेन्मार्क ओपन २०२६ च्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. गुरुवारी रात्री उशिरा झालेल्या राऊंड ऑफ १६ च्या सामन्यात तिने जर्मनीच्या यव्होन ली हिचा २१–१७, २१–१९ असा पराभव केला.उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना प्रथमच जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू आणि दक्षिण कोरियाच्या आन से यंग हिच्याशी होणार आहे.**

तन्वीने यव्होन लीविरुद्ध अवघ्या ३९ मिनिटांत विजय मिळवला. दुसऱ्या गेममध्ये कडवी लढत मिळूनही शर्माने संयम राखला आणि सलग दोन गेम जिंकत सामना आपल्या नावावर केला.प्रत्येक गुणासाठी चुरस पाहायला मिळाली आणि अनेक प्रसंगी यव्होनने आघाडीही घेतली. मात्र, १६–१६ अशी बरोबरी झाल्यानंतर तन्वीने सलग चार गुण मिळवत निर्णायक आघाडी घेतली. यव्होनने पुन्हा संघर्ष करत गुणसंख्या १९ पर्यंत नेली. परंतु, तन्वीने सलग दोन गुण मिळवत २१–१९ असा गेम जिंकून सामनाही आपल्या नावे केला.

# क्रिकेटमध्ये नव्या युगाची सुरुवात

## श्रीलंकेत १४ नोव्हेंबरपासून 'टेस्ट ट्वेंटी' स्पर्धा जगभरातील १६० युवा क्रिकेटपटू सहभागी होणार

मुंबई/कोलंबो, ता.१६ –

**क्रिकेटच्या जवळपास १५० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच मुली आणि मुलांनी केलेल्या धावांच्या एकत्रित आकड्यावर संघाच्या विजयाचा निर्णय घेतला जाणार आहे. क्रिकेटच्या नव्या 'टेस्ट ट्वेंटी' या प्रकारातील पहिली स्पर्धा १४ ते २९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथील सिंहलीज स्पोर्ट्स क्लब (एसएससी) मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत जगभरातील १३ ते २१ वर्षे वयोगटातील १६० युवा क्रिकेटपटू सहभागी होतील.**

टेस्ट ट्वेंटी हा क्रिकेटचा चौथा प्रकार असल्याचे सांगितले जात आहे.आतापर्यंत क्रिकेटमध्ये टेस्ट, एकदिवसीय आणि टी–२० हे प्रकार प्रचलित होते. या नव्या प्रकाराचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक संघाकडून मुलींचे आणि मुलांचे स्वतंत्र अकरा खेळाडूंचे संघ मैदानात उतरतील. मात्र दोन्ही संघांनी केलेल्या धावा एकाच धावसंख्येत मोजल्या जातील. दोन्ही संघांच्या एकत्रित धावसंख्येच्या आधारे सामन्याचा निकाल ठरेल.



टेस्ट ट्वेंटीमधील प्रत्येक सामना एकाच दिवसात खेळवला जाईल. प्रत्येक संघाला दोन वेळा फलंदाजी करण्याची संधी मिळेल आणि एकूण ८० षटकांचा खेळ होईल. पहिली ४० षटके दिवसा लाल चेंडूने आणि पांढऱ्या पोशाखात खेळवली जातील. त्यानंतरची ४० षटके रंगीत पोशाखात, पांढऱ्या चेंडूने एसएससी मैदानावरील फ्लडलाइट्सच्या प्रकाशात खेळवली जातील.

टेस्ट ट्वेंटीमधील चार खंडीय संघांपैकी प्रत्येक संघात ४० खेळाडू असतील. त्यात २० मुली आणि २० मुलांचा समावेश असेल. प्रत्येक सामन्यात मुलींचा संघ मुलींच्या संघाविरुद्ध आणि मुलांचा संघ मुलांच्या संघाविरुद्ध खेळेल. मात्र, दोन्ही संघांच्या कामगिरीची बेरीज करूनच संघाची अंतिम धावसंख्या निश्चित केली जाईल.

या स्पर्धेसाठी पाच खंडांमधील हजारो युवा क्रिकेटपटूंनी आपली दावेदारी सादर केली होती.गेल्या ३०० दिवसांत मैदानावर आणि ऑनलाइन आयोजित निवड प्रक्रियेद्वारे खेळाडूंच्या क्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. या समितीचे अध्यक्षपद भारताचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा भूषवत आहेत. या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या खेळाडूंच्या ड्राफ्टद्वारे अंतिम १६० खेळाडूंची नावे जाहीर केली जातील. यामध्ये ८० मुली आणि ८० मुलांचा समावेश असेल. हेच खेळाडू टेस्ट ट्वेंटीच्या पहिल्या सत्रात सहभागी होतील.स्पर्धेचे उद्घाटन १४ नोव्हेंबरला होईल, तर अंतिम सामना २९ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल.



नवरात्रौत्सवाच्या सहाव्या दिवशी श्रीमंत निपाणकर राजवाड्यातील तुळजाभवानी देवीची गजलक्ष्मी रूपात पूजा बांधण्यात आली.

# ओ.के. कापूर मॉलची तिसरी शाखा भवानी मंडप कमानीजवळ सुरु

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी)–

**भक्तीची परंपरा जोपासत गेली ५९ वर्षे पिढयानंपिढयाचा विश्वास अधिक दृढ करीत ओ.के.कापूरने निशिकांत ट्रेडर्सच्या माध्यमातून गंगावेश व लक्ष्मीपुरी येथे सुरु असलेल्या सेवेच्या ग्राहक यशस्वीतेनंतर आता श्री अंबाबाई चरणी समर्पित भवानी मंडप कमानीजवळ(भाऊसिंगजी रोड) येथे तिसरी ओ.के. कापूर मॉल शाखा सुरु करण्यात आली.**

तीन मजली भव्य मॉलव्दारे ग्राहकांना ओ.के.कापूर, ओ.के. भिमसेनी कापूर, ओ.के.अगरबत्ती, ओ. के. धूप, ओ. के. पूजा ऑईल या साहित्याबरोबर नामवंत कंपन्याच्या ओरीजनल सुवासिक अगरबत्ती आणि पूजा साहित्य उपलब्ध होत आहे.ग्राहकांनी या मॉलमध्ये भेट देऊन मालाची गुणवत्ता व सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रोप्रा. राहूल हळदे यांनी केले.




# जोतिबा देवाचा आज जागर ; मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले

जोतिबा,ता.१६ (वार्ताहर)–

**शारदीय नवरात्रौत्सवाच्या सहाव्या माळेला जोतिबा देवाची खडी अलंकारीत सरदारी सोहन कमळ पाकळीतील खडी पूजा बांधण्यात आली होती. शनिवारी १७ रोजी जोतिबा देवाचा जागर होणार आहे.यादिवशी रात्रभर मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे.**

शारदीय नवरात्र उत्सवाच्या सहाव्या दिवशी दख्खनचा राजा श्री जोतिबा देवाची मनोहारी अशी सोहन पाकळीच्या कमळ पुष्पातील खडी पूजा बांधण्यात आली होती.पहाटे ३ वाजता महाघंटेचा नाद करुन दरवाजे उघडण्यात आले.पहाटे ४ ते ५ जोतिबा मूर्तीची पाद्य पुजा मुख मार्जन,काकड आरती झाली त्यानंतर मंदिरातील धार्मिक विधीला सुरुवात झाली. दिवसभर मंदिर परिसरात विविध धार्मिक विधी झाले.



नवरात्रौत्सवाच्या सहाव्या माळेला श्री जोतिबा देवाची बांधलेली सोहन कमळ पुष्पातील महापूजा.

देवाची पुजा गावकर यांनी साकारली.सहाव्या माळेला जोतिबा देवाला तेल वाहून दर्शन घेण्यासाठी भाविक डोंगरावर दाखल झाले होते. पहाटे पासूनच भाविकांच्या गर्दीस सुरुवात झाली.जोतिबा मंदिर मार्ग भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता.उंट,घोडे, वांजत्री, देव सेवकांच्या लवाजम्यासह सकाळी दहा वाजता धुपारती सोहळा निघाला. महिलांनी पायावर पाणी घालुन धुपारतीचे स्वागत केले.

ऊस,कडाकणी,तेल अर्पण करण्यासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती. वाहन पार्किंगच्या जागा हाऊसफुल्ल झाल्या होत्या.जोतिबा बसस्थानकावरही एसटी प्रवाशाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# भारताचा झिम्बाब्वेवर विजय

## दीप्ती शर्माची नाबाद ४९ धावांची खेळी

नवी दिल्ली,ता.१६–

**भारतीय महिला संघाने झिम्बाब्वेविरुध्दच्या पहिल्या टी–२० सामन्यात ४ गडी राखून विजय मिळवला.या सामन्यात भारताची सुरुवात खराब झाली होती. अवघ्या २७ धावांत भारताने ४ विकेट्स गमावल्या होत्या.**



मात्र, दीप्ती शर्मा आणि पदार्पण करणाऱ्या निक्की प्रसादने डाव सावरला. दीप्तीच्या नाबाद ४९ धावांच्या जोरावर भारताने ११५ धावांचे लक्ष्य गाठत तीन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली. या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेला २० षटकांत ५ बाद ११४ धावांवर रोखले. झिम्बाब्वेकडून शार्ने मेयर्सने नाबाद ४३ धावांची खेळी केली.

भारताकडून नंदनी शर्माने अचूक गोलंदाजी करत ४ षटकांत केवळ ११ धावा देऊन २ विकेट्स घेतल्या. क्रांती गौड, श्री चरणी आणि अरुंधती रेड्डी यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

११५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. सलामीवीर स्मृती मंधाना ९ धावा, तर शेफाली वर्मा ४ धावा करून बाद झाली. त्यानंतर हरमनप्रीत कौरलाही अवघ्या १ धावेवर माघारी परतावे लागले. झिम्बाब्वेच्या न्याशा ग्वानझुराने भारताला मोठे धक्के दिले. त्यामुळे ५ षटकांत भारताची अवस्था ४ बाद २७ धावा अशी झाली. या परिस्थितीत भारताला विजय मिळवण्यासाठी मोठी भागीदारी करण्याची गरज होती. भारत अडचणीत असताना दीप्ती शर्मा आणि पदार्पण करणाऱ्या निक्की प्रसादने डाव सावरला. दोघींनी महत्त्वाच्या धावा जोडत भारताला विजयाच्या जवळ नेले. निक्कीने ३९ धावांचे योगदान दिले, तर दीप्तीने आक्रमक फलंदाजी करत झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर दबाव वाढवला. दीप्तीने ३७ चेंडूंत ८ चौकारांच्या मदतीने नाबाद ४९ धावा केल्या. तिच्या या खेळीमुळे भारताने १५.४ षटकांत ६ विकेट्स गमावत ११६ धावा केल्या. सुरुवातीला अडचणीत सापडलेल्या भारतीय संघाला दीप्तीच्या खेळीमुळे विजय मिळवता आला.

# न्यूझीलंडविरुध्द भारतीय संघ जाहीर

## ५ टी–२०, ५ वनडे,२ कसोटी सामने खेळणार

मुंबई,ता.१६–

**२२ ऑक्टोबरपासून न्यूझीलंडविरुद्ध भारतीय संघ खेळणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वनडे आणि कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. या दौऱ्यात भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ५ टी–२०, ५ वनडे आणि २ कसोटी सामने खेळवले जातील.**

वनडे मालिकेतील पहिल्या ३ सामन्यांसाठी शुभमन गिलकडे कर्णधारपदाची जबाबदारी असेल, तर शेवटच्या २ सामन्यांत श्रेयस अय्यर भारतीय संघाचे नेतृत्व करेल.वनडे मालिकेतील पहिल्या ३ सामन्यांमध्ये श्रेयस अय्यर उपकर्णधार असेल. या संघात रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, ऋतुराज गायकवाड, इशान किशन आणि कुलदीप यादव यांच्यासह एकूण १६ खेळाडूंचा समावेश आहे.शेवटच्या २ सामन्यांसाठी इशान किशन उपकर्णधार आणि यष्टीरक्षक म्हणून जबाबदारी सांभाळताना दिसणार आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या २ सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करेल, तर केएल राहुल उपकर्णधार असेल. या संघात यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा समावेश आहे. ऋषभ पंत आणि प्रसिद्ध कृष्णाची निवड फिटनेसच्या मंजुरीवर अवलंबून आहे.



दरम्यान,जसप्रीत बुमराह न्यूझीलंड दौऱ्यावरून कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करेल. त्यांने यावर्षी आतापर्यंत एकही कसोटी खेळलेली नाही. त्यांने शेवटची कसोटी २०२५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळली होती. वेगवान गोलंदाज आकाशदीप सिंहचेही कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. त्यांने शेवटची कसोटी जुलै २०२५ मध्ये इंग्लंडविरुद्ध ओव्हल येथे खेळली होती.४ थ्या आणि ५ व्या वनडे सामन्यांसाठी भारतीय संघातश्रेयस अय्यर (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, तिलक वर्मा, इशान किशन (उपकर्णधार आणि यष्टीरक्षक), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, नमन धीर, औकिब नबी, गुरनूर ब्रार, ऋतुराज गायकवाड, अर्शदीप सिंग, कुमार कुशाग्र (यष्टीरक्षक), मोहम्मद सिराज, यश ठाकूर आणि कुलदीप यादव यांचा समावेश असून कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, केएल राहुल (उपकर्णधार), साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), ऋषभ पंत (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप आणि कुलदीप यादव यांना समावेश आहे. ऋषभ पंत आणि प्रसिद्ध कृष्णाची निवड फिटनेसच्या मंजुरीवर अवलंबून आहे.

## बाल वैज्ञानिक स्पर्धेसाठी राजवर्धन काळेची निवड

सांगली, ता.१६(प्रतिनिधी)–

**जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बाल वैज्ञानिक स्पर्धेसाठी राजवर्धन प्रदीप काळे (भोसे) याची निवड झाली आहे.तो सांगली सिटी हायस्कूलचा विद्यार्थी आहे.**



दिल्ली येथील बाराव्या इन्स्पायर अवार्ड स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व राजवर्धन काळे याने केले होते. त्याने या प्रदर्शनात जलमार्गावरील नाव आणि बोट यांच्या संरक्षणासाठी अप्रतिम अशी संकल्पना मांडली होती. ही संकल्पना प्रदर्शनात अनेकांचे लक्ष वेधून घेतली. राजवर्धन काळे हा लक्ष्मीवाडी तालुका मिरज या प्राथमिक शाळेतील विद्यार्थी होता. प्रदर्शनात देशभरातून आठशे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेतून देशभरातील ६० विद्यार्थ्यांची जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बालवैज्ञानिक स्पर्धेसाठी निवड झाली असून त्यामध्ये राजवर्धन काळेचाही समावेश आहे. सुनील गावडे,मुख्याध्यापक रंगराव पाटील आणि इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.